दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक १३ । गुरुवार २२ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर ● जळगाव ● धुळे ● नंदुरबार ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● धाराशिव ● लातूर ● नांदेड ● परभणी ● हिंगोली ● अमरावती ● अकोला ● यवतमाळ ● बुलढाणा ● वाशिम ● नागपूर ● वर्धा ● भंडारा ● गोंदिया ● चंद्रपूर ● गडचिरोली ● मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड ● रत्नागिरी ● सिंधुदुर्ग ● पुणे ● सातारा ● सांगली ● कोल्हापूर ● सोलापूर ● नाशिक

५०० कोटी दिले नाहीत, पुरावे द्या' : एकनाथ शिंदे



नवी दिल्ली : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटी रुपये दिल्याचा आरोप केल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे आरोप फेटाळले आहेत. 'मी कोणालाही ५०० कोटी रुपये दिले नाहीत किंवा घेतलेही नाहीत. जरांगे पाटील यांनी आरोप करण्यापूर्वी शहानिशा करावी. त्यांच्याकडे पुरावे असतील, तर ते सादर करावेत. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. त्यातून दूध का दूध, पानी का पानी होईल,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याचे निमंत्रण राष्ट्रपतींना देण्यासाठी दिल्ली दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बीड येथील दसरा मेळाव्यात जरांगे यांनी शिंदे यांच्यावर ५०० कोटी रुपये दिल्याची चर्चा भाजपमध्ये असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर शिंदे यांच्या समर्थकांनी जरांगे यांच्यावर टीका केली. प्रत्युत्तरादाखल जरांगे यांनी पुरावे देण्याचा इशारा दिला होता. मराठा समाजाला न्याय देण्यासाठी आपण काम केले असून, जरांगे यांनी राजकीय व्यासपीठ बनवू नये, असेही शिंदे म्हणाले.

जिल्हा बँकेत विखे-थोरातांची सरशी

२१ पैकी ९ जागा बिनविरोध; राम शिंदेंचे स्वतंत्र आव्हान, लंके-लोखंडे आघाडी मैदानात

१२ जागांसाठी तिरंगी लढतीचे चित्र!

करण नवले / राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी राजकीय हालचालींना वेग आला. संचालक मंडळाच्या २१ जागांची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न झाले; मात्र हे प्रयत्न पूर्णतः यशस्वी ठरले नाहीत. अखेर नऊ जागा बिनविरोध झाल्या असून, उर्वरित १२ जागांसाठी निवडणुकीचा सामना रंगणार आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या सहमतीच्या राजकारणाला नऊ जागांवर यश मिळाले असले, तरी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी स्वतंत्र उमेदवार जाहीर केल्याने निवडणुकीतील समीकरणे बदलली आहेत. खासदार नीलेश लंके आणि माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील आघाडीनेही मैदानात शड्डू ठोकल्याने उर्वरित जागांसाठी तिरंगी राजकीय संघर्षाचे चित्र स्पष्ट झाले आहे.

जिल्हा बँकेवर वर्चस्व मिळविण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू होत्या. अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशीही नेत्यांकडून मनधरणीचे प्रयत्न सुरू होते. मात्र, राम शिंदे यांनी कर्जत, जामखेडसह चार जागांसाठी उमेदवार जाहीर केल्यानंतर बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांना निर्णायक मर्यादा आल्या. आता कर्जत आणि जामखेडसह अकोले, श्रीगोंदा, पारनेर व राहुरी या सोसायटी मतदारसंघांतील जागांसाठी चुरस वाढणार आहे. याशिवाय महिला राखीव, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गातील जागांवरही लढती रंगणार आहेत.

या निवडणुकीत विखे-थोरात यांची सहमती, राम शिंदे यांची स्वतंत्र भूमिका आणि लंके-लोखंडे आघाडीची रणनीती यांची कसोटी लागणार आहे. जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर कोणाची पकड मजबूत आहे, हे या निवडणुकीतून स्पष्ट होईल. नऊ जागा बिनविरोध झाल्याने विखे-थोरात गटाला सुरुवातीची आघाडी मिळाली असली, तरी उर्वरित १२ जागांवरील निकाल जिल्हा बँकेच्या सत्तेचे अंतिम चित्र ठरविणार आहेत.

बिनविरोध निवड झालेले नऊ संचालक



डॉ. सुजय विखे पाटील
राहाता




मोनिका राजळे
पाथर्डी




शंकरराव गडाख
नेवासा



राजश्री घुले
शेवगाव



बिपीन कोल्हे
कोपरगाव




करण ससाणे
श्रीरामपूर



रणजित देशमुख
संगमनेर



अक्षय कर्डिले
नगर



बिगरशेती मतदारसंघ
सचिन जगताप
बिगरशेती प्रतिनिधी



१० वर्षांच्या बंधनाचा तिघांना फटका

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार सलग दहा वर्षे संचालकपदावर राहण्याच्या मर्यादेचा परिणाम जिल्हा बँकेतील तीन नेत्यांवर झाला. माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, सीताराम गायकर आणि माजी संचालक अंबादास पिसाळ यांनी उमेदवारी मागे घेतली. घुले यांनी पत्नी राजश्री घुले यांची उमेदवारी कायम ठेवल्याने त्या बिनविरोध निवडून आल्या. अकोलेमध्ये गायकर यांनी माघार घेत मुलगी संजीवनी शिंदे यांच्यासाठी, तर कर्जतमध्ये पिसाळ यांनी माघार घेत मुलगा तुषार पिसाळ यांच्यासाठी उमेदवारीचा मार्ग खुला ठेवला. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांचाही अर्ज बाद झाला. त्यामुळे सहकारातील जुन्या नेतृत्वाच्या जागी कुटुंबातील सदस्यांना संधी देण्याचे चित्र दिसून आले.

विखे पिता-पुत्र, थोरात आणि संग्राम जगतापांची मोर्चेबांधणी

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आणि आमदार संग्राम जगताप यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली. जास्तीत जास्त उमेदवारांनी माघार घ्यावी, यासाठी अखेरच्या दिवसापर्यंत प्रयत्न सुरू होते. सोमवारी २२ उमेदवारांनी माघार घेतल्यानंतरही मोठ्या संख्येने उमेदवार मैदानात होते. अखेरच्या दिवशी उमेदवार, सूचक, अनुमोदक आणि समर्थकांनी निवडणूक कार्यालयात गर्दी केली. या प्रयत्नांतून नऊ जागा बिनविरोध करण्यात यश आले; मात्र राम शिंदे यांच्या स्वतंत्र भूमिकेमुळे उर्वरित जागांवरील राजकीय संघर्ष अटळ ठरला.

सिन्नरच्या भाविकांचा कार अपघात; तिघांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : मढी येथे दर्शनासाठी आलेल्या सिन्नर येथील भाविकांच्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट मुळा पाटबंधारे विभागाच्या कालव्यात कोसळली. घोडेगाव-सोनई रस्त्यावरील शनेश्वर दूध संघाजवळ असलेल्या कालव्याच्या पुलावर बुधवारी ही भीषण दुर्घटना घडली. कालव्यात पाणी सुरू असल्याने कारमधील तिघांचा मृत्यू झाला, तर एकजण सुदैवाने बचावला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कार (क्रमांक MH 03 BW 7884) मढी येथे दर्शनासाठी जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार पुलावरून थेट कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत रणधीर भाऊसाहेब, केरू पवार आणि सुभाष बिडवे यांचा मृत्यू झाला. या तिघांची पूर्ण नावे व अन्य तपशील मिळू शकले नाहीत. संदीप सदाशिव कदम हा या अपघातातून बचावला.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सोनई पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव सहायक फौजदार मच्छिंद्र आडकित्ते पो. कॉ सुनील पालवे वजीर शेख कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. क्रेनच्या साहाय्याने कालव्यातील कार बाहेर काढण्यात आली. मृत व्यक्तींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी नेवासा येथे पाठविण्यात आले.या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघाताबाबत पुढील तपास पोलीस करीत आहेत.



पेट्रोल पंपावरील हुज्जतीतून बनावट नोटांचे बिंग फुटले!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा-नगर महामार्गावरील कोळगाव येथे बनावट नोटांचा संशयास्पद प्रकार उघडकीस आला आहे. माजी आमदार राहुल जगताप यांच्या आरजे पेट्रोलियम पेट्रोल पंपावर ५०० रुपयांच्या बनावट नोटांचा वापर होत असल्याचा संशय कर्मचाऱ्यांना आला होता. त्यावर लक्ष ठेवून असतानाच एका व्यक्तीशी झालेल्या हुज्जतीतून प्रकरणाला कलाटणी मिळाली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार शिरसागर यांचे आरटीपीसी इरफान शेख यांनी प्रसंगावधान राखत हस्तक्षेप केला. बेलवंडी पोलिसांनी संबंधित व्यक्तीची झडती घेतली असता ३६ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा आढळल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी किरण काढण्या भोसले (रा. कोळगाव) याला ताब्यात घेण्यात आले असून, बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही दिवसांपासून नोटांबाबत संशय – आरजे पेट्रोलियम वरील कर्मचाऱ्यांना मागील काही दिवसांपासून ५०० रुपयांच्या नोटांबाबत संशय येत होता. कर्मचाऱ्यांनी लक्ष ठेवले असता संबंधित व्यक्तीशी विचारणा करताना हुज्जत झाली. त्याचवेळी पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या आरटीपीसी इरफान शेख यांनी परिस्थितीची दखल घेतली. संशय बळावल्याने त्यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने संबंधित व्यक्तीला थांबवून बेलवंडी पोलिसांना बोलावले. पोलिसांच्या झडतीत बनावट नोटा आढळल्याने या प्रकाराचे गांभीर्य वाढले.

'बोकड विकले, पैसे मिळाले'; दाव्याची पडताळणी सुरू

पोलिसांच्या चौकशीत संबंधित व्यक्तीने काही पैसे सापडल्याचे, तर काही पैसे बोकड विकल्यानंतर व्यापाऱ्याकडून मिळाल्याचे सांगितल्याची माहिती आहे. मात्र, या दाव्याची सत्यता आणि नोटांचा नेमका स्रोत तपासातून स्पष्ट होणार आहे. (पान ४ वर)

पुतण्याने केलेल्या मारहाणीत चुलत्याचा मृत्यू, खुनाचा गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



राहुरी : राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे दोन दिवस चुलता व पुतण्यामध्ये किरकोळ मारहाण झाल्यानंतर तिसऱ्या वेळी पुतण्याने चुलत्याला रस्त्यात अडवून गुप्तांगावर लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या चुलत्याचा रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली.

या घटनेतील मयत विलास परसराम मोकाटे व त्यांचा चुलत पुतण्या अक्षय कैलास मोकाटे, दोघे रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, या दोघांमध्ये ३० सप्टेंबर २०२६ रोजी किरकोळ कारणावरुन वाद होऊन मारहाण झाली होती. त्यानंतर २ ऑक्टोबर रोजी पून्हा दोघांमध्ये मारहाण झाली. या घटने बाबत राहुरी पोलिस ठाण्यात परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते.

दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजे दरम्यान विलास मोकाटे हे मोटारसायकलवर चेडगाव येथून ब्राम्हणीकडे येत असताना अक्षय मोकाटे व इतर आरोपींना त्यांना चेडगाव ब्राम्हणी रस्त्यावर अडवीले. त्यानंतर आरोपींनी विलास मोकाटे यांना गुप्तांवर लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या मारहाणीत विलास मोकाटे हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना अहिल्यानगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दरम्यान पोलिस पथकाने ताबडतोब घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. त्यानंतर मयत विलास मोकाटे यांची पत्नी संगिता मोकाटे यांनी त्यावेळी आरोपी अक्षय कैलास मोकाटे, विकास सुखदेव (पान ४ वर)

सहकार सम्राटांच्या खुर्चीला सर्वोच्च न्यायालयाचा धक्का!

सलग १० वर्षे संचालक राहिलेल्यांच्या पात्रतेचा प्रश्न ऐरणीवर; राज्यातील १०० हून अधिक नेत्यांच्या राजकीय गणितांना फटका बसण्याची शक्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर वर्षानुवर्षे वर्चस्व गाजविणाऱ्या सहकार सम्राटांच्या सत्तेला आता कायदेशीर आव्हान उभे राहिले आहे. सहकारी बँकांमध्ये सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्या व्यक्तींच्या पात्रतेसंदर्भातील प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केल्याने राज्यातील सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या निर्णयाचे पडसाद आगामी जिल्हा बँकांच्या निवडणुकांमध्ये उमटण्याची शक्यता असून, मंत्री, आमदार आणि आजी-माजी लोकप्रतिनिधींसह शंभरहून अधिक नेत्यांच्या राजकीय गणितांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे वर्षानुवर्षे सहकारी बँकांवर पकड ठेवणाऱ्या नेत्यांना आता पर्यायी नेतृत्वाचा शोध घ्यावा लागण्याची शक्यता आहे.



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जातात. शेतकऱ्यांना पीककर्ज पुरविण्यापासून ते विविध सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांपर्यंत या बँकांची भूमिका महत्त्वाची असते. मात्र, आर्थिक व्यवहारांबरोबरच या बँका ग्रामीण राजकारणाची सत्ताकेंद्रेही बनल्या आहेत. संचालक मंडळावरील वर्चस्वाच्या माध्यमातून राजकीय ताकद वाढविण्याची संधी अनेक नेत्यांना मिळाली. काही ठिकाणी एकाच नेतृत्वाने अनेक वर्षे बँकेच्या कारभारावर पकड कायम ठेवली. आता संचालकांच्या कार्यकाळाबाबतच्या कायदेशीर तरतुदींमुळे या सत्ताकेंद्रांचे समीकरण बदलण्याची चिन्हे आहेत.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीवरून सुरू झालेल्या राजकीय संघर्षाने या प्रकरणाला निर्णायक वळण मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकारमंत्री तथा बँकेचे संचालक बाबासाहेब पाटील यांच्या पात्रतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यांच्याविरोधात न्यायालयात तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेकडे तक्रारी करण्यात आल्या. त्यानंतर त्यांचे जिल्हा बँकेतील संचालकपद संपुष्टात आले. पुन्हा निवडणूक लढविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनाही न्यायालयीन निर्णयामुळे अडथळा निर्माण झाल्याचे चित्र आहे. केंद्र सरकारने सहकारी बँकांमधील दीर्घकाळ (पान ४ वर)

दिग्गजांच्या खुर्चीला धक्का....

या निर्णयामुळे राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांच्या राजकीय भवितव्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा कोल्हापूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष हसन मुश्रीफ, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, आमदार दिलीप वळसे पाटील, भाजपचे आमदार प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड, सुनील राऊत, राजेश विटेकर, विनय कोरे, एकनाथ खडसे, सुरेश देशमुख, रमेश थोरात, प्रताप पाटील चिखलीकर, गुलाबराव देवकर, रामप्रसाद बोर्डीकर, सुरेश वरपुडकर आणि अनिल पाटील यांच्यासह अनेक नेत्यांच्या पात्रतेचा मुद्दा चर्चेत आहे. मात्र, संबंधित प्रत्येक नेत्याला या निर्णयामुळे अपात्र ठरविले जाईल, असे गृहीत धरता येणार नाही. संबंधित बँकेतील संचालकपदाचा सलग कार्यकाळ, लागू असलेल्या कायदेशीर तरतुदी आणि त्यासंदर्भातील अधिकृत निर्णय यांवर अंतिम पात्रता अवलंबून असेल.

अहिल्यानगरसह राज्यातील निवडणुकांवर परिणाम?

अहिल्यानगर, यवतमाळ, लातूर, सातारा आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आगामी काळात मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, जळगाव, धुळे-नंदुरबार, रत्नागिरी आणि अमरावती येथील जिल्हा बँकांच्या निवडणुकाही होणार आहेत. त्यामुळे या निर्णयाचे परिणाम राज्यभर जाणवण्याची शक्यता आहे.

मेळावे झाले बहु, पण आवाज कोणाचा?

दसरा म्हटला की, मेळावे ठरलेले. आता तर मेळाव्याचे पेवच फुटतात. विचारांचे सोने लुटण्यासाठी म्हणे मेळावे भरतात. कालच्या दसऱ्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,ठाकरे सेना, शिंदे सेना, पंकजा ताई मुंढे, मनोज जरांगे आदींचे मेळावे झाले.ज्याने त्याने आपले गड राखण्याचा आटोकाट प्रयत्न केला.आपल्यारीने गर्दी जमवली.प्रश्न आहे तो विचाराच्या सोन्याचा. यापैकी कोणत्या मेळाव्यातून आणि नेत्याकडून वैचारिक सोन्याची उधळण झाली, हा सोन्यासारखा लाख मोलाचा सवाल आहे!

नागपूरला सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी आंदोलने राजकीय हत्यार बनू नयेत असे आवाहन केले. हे करताना ते आंदोलनाचा भूतकाळ विसरले. आंदोलने हेच विरोधकांचे हत्यार असते. आणि असे हत्यारे वापरूनच भाजपने सत्तेचा सोपान गाठला याचा त्यांना सोयीस्कर विसर पडला. मोहनजी भागवत जन-जी वर बोलले.त्यासाठी स्वतंत्र शाखा काढण्याचे भाष्य केले. पण, शाखा काढून ज्यासाठी जेन -झी संघर्ष करतेय त्या प्रश्नाची उत्तरे मिळतील का, हा प्रश्न आहे. शाखेऐवजी उद्योग, कारखाने उभारून युवकांना रोजगार द्या असे भागवतांनी सरकारला ठणकावून सांगितले असते, तर ह्या मेळाव्याचा आवाज बुलंद ठरला असता.पण, प्रत्यक्षात जो आवाज घुमला तो राजकीय ठरला.

कोणे एकेकाळी शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे हयात असताना, दसरा मेळावा आणि शिवाजी पार्क हे खास आकर्षण असायचे. भलेबुरे काही असो पण बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यात वेगळीच मजा असायची. दे धडक तू बेधडक ह्या वृत्तीमुळे स्व. बाळासाहेबांचे भाषण हि पर्वणी असायची. त्यांचे खुमासदार आणि खास शैलीतील भाषण खऱ्या अर्थाने वैचारिक शब्दसोन्याची उधळण असायची. आता शिवाजीपार्कचा तो दिमाख, उत्साह आणि जनसागराला ओहोटी लागली आहे. उद्धव ठाकरे यांनी कालच्या मेळाव्यात नेमके काय साधले आणि कोणते वैचारिक सोने उधळले हा प्रश्न पडतो.

उद्धव यांचे पूर्ण भाषण हे त्यांच्या गधळालेल्या स्थितीचे द्योतक होते. पदोपदी त्यांच्यातील आत्मविश्वास हरवल्याचे जाणवत होते. मतचोरी ह्या एकमेव विषयाभोवती त्यांचे भाषण फिरत राहिले. थोडेफार दुष्काळ, शेतकऱ्यांची होरपळ यावर ते बोलले. पण, त्याला म्हणावी तशी धार नव्हती. खरे तर उद्धव यांना मतचोरी ऐवजी बेरोजगारी, दुष्काळ, शेतकरी प्रश्न, पाणीप्रश्न, महागाई अशा अनेक प्रश्नावर आवाज उठवण्याची संधी होती. ती उद्धव यांनी गमावली आणि मेळाव्याचा आवाज शिवाजीपार्क पुरताच उरला!

उपमुख्यमंत्री एखानाथ शिंदे यांनी अपेक्षेप्रमाणे उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल करून अपेक्षाभंग केला!किती काळ आता त्याच त्या चोथा झालेल्या विषयावर बोलणार, हा प्रश्न पडतो. शिवसेना दुभंगली हा इतिहास झालाय हे शिंदे यांनी ध्यानात घेतले तर बरे होईल. मुख्यमंत्री असताना हे केले, ते केले हे सांगण्यापेक्षा वर्तमान दुष्काळाच्या संकटाला सरकार कसे सामोरे जाणार हे सांगणे अपेक्षित होते. आजची स्थिती टिकाटिपणीची नसून एकत्रितपणे समोरे जाण्याची आहे, याचे भान राखणे अपेक्षित होते.तसे न होता शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल तर पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा यांची आरती ओवळण्यात धन्यता मानली. त्यामुळे शिंदेच्या मेळाव्यात फक्त कटुता आणि ठाकरे द्वेषाच्या आवाजाशिवाय काहीच नव्हते.

पंकजताई मुंढे यांच्या मेळाव्यातून नेमके काय साध्य झाले किंवा होते हे समजण्यास मार्ग नाही. स्व. गोपीनाथ मुंढे असताना भगवान गडावरील मेळाव्याकडे बहुजन समाजाचा मेळावा म्हणून बघीतले जायचे. याचे कारण गोपीनाथराव हे लोकनेते होते. त्यांना मोठा जनाधारही होता.पक्षातीत



असे ते नेते होते. त्यांचेनंतर ह्या मेळाव्याला उतरती कळा लागली. मेळाव्याला राजकीय स्वरूप आल्याने भगवानगड मेळाव्यासाठी बंद केला गेला.

यामुळे पंकजताईंनी भगवानगडाच्या पायथ्याशी गोपीनाथगड येथे मेळावा घेण्याची परंपरा सुरु केली. हेच पंकजाताईचे अपयश ठरते. गोपीनाथजी गेल्यानंतर पंकजाताई तशा उपेक्षित राहिल्या. केवळ त्यांचे बंधू अजितदादा यांचे समर्थक धनंजय मुंढे अडचणीत आल्याने पंकजताई मंत्रीमंडळात परतल्या, हे वास्तव आहे. अशा पंकजाताई एकतर्फी लोकनेत्या समजून मेळावा घेतात. ह्या मेळाव्यातून पंकजाताई नेमके काय साधतात हेच कळत नाही. स्वतःचे अस्तित्व दाखवून देण्याच्या पलीकडे यातून काहिच साध्य होत नाही. त्यामुळे हा मेळावा म्हणजे पंकजताईचा मेरी आवाज सुनो यापलीकडे फारसा चर्चेचा किंवा लक्षवेधी ठरत नाही, हेच वास्तव आहे.

नारायणगड येथील मनोज जरांगे यांचा मेळावा हा कशासाठी होता हेच कळत नाही. जरांगे यांना नको इतके डोक्यावर घेतल्याने ते डोक्यावर पडल्यागत बडबडत आहेत. आपण काय बोलतो हेच त्यांना कळत नाही. आज ज्याची स्तुती, उद्या त्यालाच शिव्या हि जरांगे निती. याचाच प्रत्यय नारायण गडावरील मेळाव्यात रश्रश. माझ्याविरुद्ध कट रचल्याचा आरोप करून त्यांनी मराठा समाजाची सहानभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. आता ह्या मेळाव्यात मराठा समाजाचा आवाज उठणे अपेक्षित होते. तिथे आवाज उठला तो पाचशे कोटी दिल्याच्या आरोपाचा आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आणि भाजप विरोधात.आता हा समाजाचा आवाज की जरांगेचा टाहो, हे शोधावे लागेल.

आणखी एक मेळावा झाला तो सुरेश धस यांचा मच्छिन्द्रगडावर. आता हा कितपत गांभीर्याने घ्यायचा हे ज्याने त्याने ठरवावे. पण, सुरेश धस हेच एकमेव की, जे शेतकरी आणि दुष्काळावर पोटतीडकीने बोलले.कोणतीही राजकीय टीका टिपणी केली नाही.दुष्काळ,शेतकरी, पाणीप्रश्न, पशुधन यावर ते बोलले. शेतकऱ्यांना सावरा अ...से आवाहन त्यांनी केले. माझ्यामते कालच्या दसरा मेळाव्यात हाच सच्चा आवाज होता. बाकी ज्याने त्याने ठरवावे.मेळावे झाले बहु..... पण आवाज कोणाचा,हे तुम्हीच ठरवावे.

आवजीनाथ बाबा देवस्थानला 'ब' वर्ग दर्जा मिळवून देणार : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : लोहारे येथील आवजीनाथ बाबा देवस्थान हे जागृत देवस्थान असून सर्व समाजासाठी श्रद्धेचे आणि प्रेरणेचे केंद्र आहे. या देवस्थानाचा सध्या असलेला 'क' वर्ग दर्जा बदलून 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करणार असून, यासाठी ग्रामस्थ आणि देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर तालुक्यातील लोहारे येथे आवजीनाथ बाबा यात्रा उत्सवानिमित्त आमदार खताळ यांनी देवस्थानात दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांच्या हस्ते देवस्थान परिसरातील विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. देवस्थानच्या विकासासाठी यापूर्वी पर्यटनाच्या माध्यमातून २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. केवळ निधी उपलब्ध करून देणे पुरेसे नसून कामांचा दर्जा आणि गुणवत्ता राखणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमदार खताळ म्हणाले, की मागील वर्षी हिवरगाव पावसा येथील देवगड देवस्थानाला 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्यात आला.



यंदा किमान तीन, तर पुढील वर्षी पाच देवस्थानांना हा दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. 'ब' वर्ग दर्जामुळे शासनाकडून विकासासाठी निधी उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे आवजीनाथ बाबा देवस्थानच्या नियोजनबद्ध विकासासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा. देवस्थानच्या विकासकामांबाबत आपल्या कार्यकाळात कोणतीही निराशा होऊ देणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

दुष्काळात शेतकऱ्यांना मदतीचा हात

तालुक्यात सरसकट पीक पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या असून, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आहेत. त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

मुलींसाठी सायकली, महिलांना शिलाई यंत्रे

संगमनेर मतदारसंघातील विद्यार्थिनींसाठी ५०० सायकली आणि महिलांसाठी ५०० शिलाई यंत्रे उपलब्ध करून देण्याचा शब्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे खताळ यांनी सांगितले. तसेच आदिवासी शेतकऱ्यांना वित्तपुरवठा कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी त्रास दिल्यास तो सहन केला जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, शिवसेना-महायुतीचे कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुरी नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच

महिला व बालकल्याण विभागासाठी स्वतंत्र दालन उपलब्ध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच महिला व बालकल्याण विभागासाठी स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्यात आले. या दालनामुळे शहरातील महिलांना आपल्या वैयक्तिक समस्या, अडचणी आणि व्यथा मोकळेपणाने मांडता येणार असून, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पालिका प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही माजी नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे यांनी दिली.

राहुरी नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात महिला व बालकल्याण विभागासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या स्वतंत्र दालनाचे उद्घाटन दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी डॉ. उषाताई तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उप नगराध्यक्ष हर्ष तनपुरे, मुख्याधिकारी विद्या पाटील यांच्यासह पालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक आणि महिला नगरसेविका उपस्थित होते. अनेक महिलांना पुरुष लोकप्रतिनिधीं समोर आपल्या वैयक्तिक समस्या आणि व्यथा मांडताना



संकोच वाटतो. त्यामुळे महिला व बालकल्याण विभागासाठी स्वतंत्र दालन असणे आवश्यक होते. या दालनात महिलांना महिला व बालकल्याण विभागाच्या सभापतींकडे आपल्या अडचणी मांडता येतील. नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्या सहकार्याने महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे डॉ. उषाताई तनपुरे यांनी सांगितले.

महिला नगरसेविकांकडून महिला व बालकल्याण विभागाला स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने केली जात होती. माजी नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मागणी पूर्ण झाली. राहुरी शहरातील महिलांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे, असे महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती स्मिता भुजाडी यांनी सांगितले.

यावेळी माजी उप नगराध्यक्ष गजानन सातभाई, नगरसेवक अविनाश म्हस्के, प्रदीप भुजाडी, सोन्याबापू जगधने, प्रतीक तनपुरे, बबन गुलडगड, प्रशांत डौले, आस्मा शेख, वृषाली तनपुरे, संगिता जाधव, प्रियंका आहेर, प्रियंका काशिद, मनिषा बर्डे, सिंधुबाई डावखर, प्रसन्ना वराळे, मनिषा भौंगळ तसेच भारत भुजाडी, सुर्यकांत भुजाडी, निलेश जगधने, आरिफ शेख, आण्णासाहेब तोडमल, प्रदिप भुसे, वैभव पवार आदी उपस्थित होते.

महिला व बालकल्याण विभागासाठी स्वतंत्र दालन उपलब्ध झाल्याने राहुरी शहरातील महिलांना आपल्या समस्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. या उपक्रमातून महिलांच्या प्रश्नांना न्याय मिळेल आणि त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रभावी प्रयत्न होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मानोरीच्या रेणुका मातेच्या चरणी नतमस्तक होण्याचे भाग्य लाभले!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वळण : राहुरी तालुक्यातील मानोरी येथील श्री रेणुका माता भगवती संस्थान व सार्वजनिक देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित होम पूजेत श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि त्यांच्या पत्नी ओवीताई सहभागी झाल्या. त्यांच्या शुभहस्ते विधिवत होम पूजा करण्यात आली. यावेळी बोलताना, विविध सण-उत्सवांच्या काळात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहावे लागते. त्यामुळे स्वतःसह कुटुंबासाठी वेळ देणे कठीण होते. मात्र, मानोरीच्या रेणुका माता संस्थानाने होम पूजेचा मान दिल्याने सपत्नीक मातेच्या चरणी नतमस्तक होण्याचे भाग्य लाभले, अशी भावना वाघचौरे



यांनी व्यक्त केली. संस्थानची उत्तरोत्तर प्रगती व्हावी आणि सर्वत्र शांतता व सुव्यवस्था नांदावी, अशी प्रार्थनाही त्यांनी केली. माहूरगडच्या रेणुका मातेचे मानोरीतील धार्मिक महत्त्व, परंपरा आणि इतिहास जाणून आनंद झाल्याचे सांगत, पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांनी लावलेल्या धार्मिक परंपरेच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी संस्थानचे अध्यक्ष नानासाहेब आढाव, सचिव उत्तमराव खुळे, उत्तमराव आढाव, ह.भ.प. शंभूगिरी महाराज गोसावी, निवृत्ती आढाव, कचरू आढाव, पत्रकार गोविंद फुणगे, हवालदार नितीन भालेराव यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोर गतिरोधक बसवा, मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा-नेवासा फाटा मुख्य रस्त्यावरील मुळा एज्युकेशन संस्थेच्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोर वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी गतिरोधक बसवावेत, अशी मागणी महाविद्यालय प्रशासनाने केली आहे. पालकांच्या सूचनेनुसार महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनानुसार, श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात दररोज हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी ये-जा करतात. महाविद्यालय सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होते. मात्र, या मुख्य रस्त्यावरून जाणारी वाहने वेगाने धावत असल्याने विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना अडचणींचा सामना करावा लागतो.

महाविद्यालयासमोरील रस्त्यावर वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांत या ठिकाणी लहान-मोठे अपघात घडल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेळीच उपाययोजना न केल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता



येत नाही, अशी चिंता महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केली आहे.

विद्यार्थी आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर तातडीने योग्य आकाराचा गतिरोधक बसवावा. तसेच वाहनचालकांना सावध करण्यासाठी आवश्यक वाहतूक सूचना फलक लावावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असल्याने गतिरोधक बसविणे ही काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग या मागणीवर काय कार्यवाही करतो, याकडे पालक, विद्यार्थी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बदल स्वीकारा, स्वतःला अद्ययावत ठेवा : क्रिष्णाकुमार नेलनथुला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : आज शिकलेले ज्ञान उद्या कालबाह्य ठरू शकते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी बदल स्वीकारून स्वतःला सतत अद्ययावत ठेवावे. तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात तंत्रज्ञानासोबत वाटचाल करताना त्याचा योग्य वापर करावा, कम्फर्ट झोनच्या बाहेर पडून मोठ्या आकांक्षा बाळगाव्यात आणि जागतिक स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहन ॲपोटेक्स इंडिया कंपनीचे डायरेक्टर एचआर श्री क्रिष्णाकुमार नेलनथुला विध्यार्थ्यांना केले.संजीवनी फार्मसी महाविद्यालयात डी. फार्मसी, बी. फार्मसी व एम.फार्मसी च्या प्रथम वर्षाच्या नवागतांच्या स्वागत समारंभ व अभिमुखता कार्यक्रमात नेलनथुला प्रमुख पाहुणे म्हणन बोलत होते. संजीवनी



युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले . यावेळी डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, कार्पोरेट रिलेशन्स विभागाचे व्हाईस प्रेसिडेंट इम्राण शेख, डॉ. प्रमोद कडू व डॉ. दिपक मुसमाडे व्यासपीठावर उपस्थित होते. पालक व विद्यार्थ्यांची हजेरी उल्लेखनिय होती.प्रारंभी डॉ. पटेल यांनी सर्वांचे स्वागत करून संजीवनी फार्मसी महाविद्यालयाने स्थापित केलेल्या विविध कीर्तिमानांची माहिती दिली. यावेळी शेख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. नेलनथुला पुढे म्हणाले की महाविद्यालयीन जीवन हे केवळ पदवी मिळविण्याचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व विकासाची आणि जीवनातील आव्हानांसाठी स्वतः ला घडविण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे. या काळात ज्ञान, कौशल्ये आणि जीवनमूल्ये आत्मसात करा.

समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'मी अँड मॉम' दांडिया स्पर्धा उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : मातृत्वाचा सन्मान, आई आणि पाल्यांमधील स्नेहबंध अधिक दृढ करण्यासह भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित 'मी अँड मॉम दांडिया स्पर्धा २०२६' उत्साहात पार पडली. या सांस्कृतिक सोहळ्यात तब्बल १०० मातृ-पाल्य जोड्यांनी सहभाग नोंदविला. पारंपरिक वेशभूषा, दांडियाचा ताल आणि नृत्यातून व्यक्त होणाऱ्या मायलेकरांच्या प्रेमबंधामुळे शालेय परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले.

इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धेत आई आणि पाल्यांच्या जोड्यांनी नृत्यकौशल्य, तालबद्धता, कल्पक हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. उत्कृष्ट जोडी, नृत्यकौशल्य, पारंपरिक वेशभूषा, कल्पकता आणि सादरीकरणातील वैशिष्ट्यपूर्णता अशा विविध निकषांवर स्पर्धेचे मूल्यमापन करण्यात आले. त्यामुळे सहभागी जोड्यांना आपापले कलागुण सादर करण्याची आणि वेगळेपण सिद्ध करण्याची संधी मिळाली.

स्पर्धेत शौर्य शर्मा व मोनिका शर्मा यांनी प्रथम क्रमांक, ध्रुव शर्मा व रविना शर्मा यांनी द्वितीय क्रमांक, तर कियांश बागरेचा व रूपाली बागरेचा यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या जोड्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. याशिवाय विविध निकषांनुसार प्रत्येक गटातून प्रत्येकी १३ विजयी जोड्यांची निवड करून त्यांनाही ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाला समता इंटरनॅशनल स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांची प्रमुख उपस्थिती होती. वृंदा पटेल आणि मोनिका पटेल यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. दांडियाच्या संकल्पनेवर आधारित आकर्षक आणि कलात्मक सजावटीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. नवरात्रोत्सवाच्या मंगलमय वातावरणाची अनुभूती देणारी सजावट आणि रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषा यांमुळे सोहळ्याला विशेष रंगत आली.

विखे-थोरात सहकार्याची एक्स्प्रेस करण ससाणेंच्या पथ्यावर !

कर्तृत्ववान नेतृत्वाला संधी; जिल्हा बँकेच्या संचालकपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : जिल्हाभर राजकीय ताणतणाव आणि जोडतोडीचे राजकारण सुरू असताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यातील सहकार्याचा फायदा श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे यांना झाला. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी त्यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीचे श्रीरामपूर तालुक्यात स्वागत होत आहे. विखे पाटील आणि थोरात यांच्या संयुक्त बैठकीनंतर श्रीरामपूर तालुक्यातील सोसायटी मतदारसंघातून करण ससाणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानंतर या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या रणजित बनकर आणि सोन्याबापू शिंदे यांनी माघारीच्या अखेरच्या दिवशी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे ससाणे यांची बिनविरोध निवड



निश्चित झाली.जिल्हा बँकेच्या संचालकपदी दुसऱ्यांदा संधी मिळाल्याने ससाणे यांची राजकीय ताकद अधोरेखित झाली आहे. माजी आमदार स्वर्गीय जयंत ससाणे यांचा राजकीय वारसा ते समर्थपणे पुढे नेत असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, ओबीसी मतदारसंघातून नीरज सिद्धार्थ मुरकुटे यांनीही उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे यंदा जिल्हा बँकेच्या संचालक मंडळात मुरकुटे हे नाव नसणार आहे.

त्रिमूर्ती शैक्षणिक व क्रीडा संकुलात विजयादशमी निमित्त शस्त्रपूजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक व क्रीडा संकुलाच्या नेवासा शाखेत विजयादशमीच्या पावन मुहूर्तावर शस्त्र पूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. संकुलातील रायफल शूटिंग, तलवारबाजी व आर्चरीच्या रेंजवर विविध शस्त्रांची विधिवत पूजा करण्यात आली. विजयादशमी म्हणजेच शस्त्र पूजेचा दिवस मानला जातो. या दिवशी शस्त्रांची पूजा केल्याने यश प्राप्त होते, अशी मान्यता आहे. त्याच परंपरेनुसार संकुलात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संस्थेच्या नेवासा शाखेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे विविध प्रकारचे खेळ शिकवले जातात. यामध्ये हॉलीबॉल,मॅटवरील व मातीतील कुस्ती, कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स, क्रिकेट, बॅडमिंटन या खेळांसह रायफल शूटिंग,



आर्चरी तसेच तलवारबाजी सारख्या साहसी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. या सर्व खेळांच्या साहित्याची व शस्त्रांची विजयादशमी च्या निमित्ताने पूजा करण्यात आली. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा ॲड. स्नेहल चव्हाणपाटील, कार्यकारी अधिकारी डॉ गौरव आमलेपाटील, प्राचार्य सोपान काळे, प्राचार्य दिपाली बाविस्कर,उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे,विभाग प्रमुख जितेंद्र पाटील, मिलिंद सोनवणे, रायफल शूटिंगचे राष्ट्रीय पंच व प्रशिक्षक छबूराव काळे,खेळाडू व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी खेळात प्राविण्य मिळवण्यासाठी आणि संस्थेच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला.खेळ हे देखील आधुनिक युगातील शस्त्रच आहेत आणि त्यांची पूजा करणे म्हणजे खेळाप्रती आदर व्यक्त करणे होय, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

नेवाशात बिरोबाच्या मानाच्या झेंडा मिरवणुकीचे उत्साहात स्वागत

जुन्या परंपरेचे पुनरुज्जीवन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : दसरा सणानिमित्त धनगर समाजाच्या बिरोबाच्या झेंडाकाठीसह इतर मानाच्या झेंडा मिरवणुकीचे नेवासा येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील आणि महसूल विभागाचे मंडलाधिकारी अनिल गव्हाणे यांच्या पुढाकारातून जुन्या पिढीपासून चालत आलेली पानसुपारी व स्वागताची लोप पावत असलेली परंपरा पुन्हा सुरू करण्यात आली.

वीरभद्र झेंडाकाठी मिरवणुकीचा प्रारंभ धनगर गल्लीतील मारुती मंदिरापासून झाला. मिरवणूक तलाठी



कार्यालयात आल्यानंतर नगराध्यक्ष डॉ. घुले पाटील यांनी गळ्यात डफ अडकवून तो वाजवत झेंडाकाठीचे स्वागत केले.

यावेळी मंडलाधिकारी गव्हाणे आणि नगराध्यक्षांच्या हस्ते झेंडाकाठीचे पूजन करण्यात आले. उपस्थित बांधवांना टोपी, उपरणे, पानसुपारी आणि चहापाणी देऊन सन्मानित करण्यात आले. 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. सीमोल्लंघनाच्या ठिकाणी खुपटी रस्त्यावरील जामदार मळ्यात वीरभद्र झेंडाकाठीचे, तर माळी वस्तीवरून आलेल्या कान्होबा झेंडाकाठीचे सुवासिनींनी पंचारती ओवाळून पूजन केले. दसरा उत्सव समितीसह जामदार आणि गायकवाड परिवाराच्या वतीने भाविकांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी धनगर समाजाचे नेते श्रीमंत कान्हू अण्णा दाणे, आबासाहेब बुचुडे, नगरसेवक दिनेश व्यवहारे, जालिंदर गवळी, पत्रकार सुधीर चव्हाण, रविंद्र शेंडे, राहुल चव्हाण, सुनील गायकवाड यांच्यासह समाजबांधव आणि भाविक उपस्थित होते.

अनागोंदी जमा-खर्चाचे वाचन

जुन्या परंपरेनुसार महसूल विभागाच्या वतीने मंडलाधिकारी अनिल गव्हाणे यांनी रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे आणि नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांच्या उपस्थितीत अनागोंदी जमा-खर्चाचे वाचन केले. यावेळी एक कोटी ५० लाख एक रुपयांचे अंदाजपत्रक मांडून त्यातून विकासकामे कशी करावीत, याचे चावडी वाचन करण्यात आले.

द•ख•ल

साधेपणाने दिवाळी साजरी करून दुष्काळग्रस्तांना मदत करा : ढगे



नेवासा : दुष्काळाच्या संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि गरजू कुटुंबांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी यंदाची दिवाळी साधेपणाने साजरी करावी. श्रीमंत नागरिक, लोकप्रतिनिधी, मंत्री, आमदार आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेऊन दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात द्यावा, असे आवाहन अशोकराव ढगे यांनी केले आहे. दिवाळीत फटाक्यांवरील खर्च कमी करून पर्यावरणाचे रक्षण करावे. महागडे कपडे, दिखाऊपणा आणि अनावश्यक खर्च टाळून वाचलेली रक्कम गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वापरावी. गरिबांना अन्नधान्य, मिठाई, कपडे आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवावा, असे त्यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी संत-महंत, धार्मिक संस्था आणि सेवाभावी संघटनांनी गावोगावी अन्न बँक व चारा बँक सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. मंत्री, आमदार, उद्योजक आणि दानशूर व्यक्तींनी मदतकार्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी म्हटले आहे.सामाजिक बांधिलकी जपत प्रत्येकाने दुष्काळ निवारणासाठी सहकार्य करावे. माणुसकी, एकता आणि संवेदनशीलतेच्या माध्यमातून यंदाची दिवाळी समाजहिताची बनवावी, असे आवाहन ढगे यांनी केले आहे.

नवरात्र उत्साह निमित्त महिलांना बक्षीसाचे वाटप



सोनई : कांगोणी(ता. नेवासा)येथील खंडोबा देवस्थान आयोजित व सिद्धिविनायक मित्र मंडळ,, मोरया मित्र मंडळ व स्वराज्य ग्रुपच्या विशेष सहकार्याने श्री खंडोबा मंदिर प्रगणात शारदीय नवरात्र निमित्ताने महिलांसाठी स्पर्धात्मक खेळाच्या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यां कालावधीत विविध स्पर्धा मालिकेत विजयी होणाऱ्या महिलांना मोठ्या गटातील व छोटा गटातील विजेतांना महिला नेत्या उषाताई गडाख यांच्या हस्ते बक्षीस प्रदान करण्यात आली. यामध्ये निंबू चमचा, मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची,सादरकर्ते गणेश वीर,गणेश हापसे संचालित होम मिनिस्टर,उखाणे,आकर्षक वेशभूषा,आदीचा समावेश होता. साडी व टिफिन बॉक्स सह २०० हुन अधिक बक्षीस भेट स्वरूपात देण्यात आले. सरपंच रोहिणी कराळे गीता सोनवणे, प्रतीक्षा वीर लताताई चौधरी, अलका रावडे,निशा ठोंबळ अनुपमा रौदळ, वनिता रौदळ,वैशाली रौंदळ, पूनम ठोंबळ, संगीता विरकर, मीराबाई बोरुडे, पूजा एडके आदींनी उपक्रम यशस्वीतेसाठी साठी परिश्रम घेतले. सांगता सुजाता इंटरनाशनल स्कुलच्या सांस्कृतीक कार्यक्रमानी पार पडली.

नेवासा येथील गाडेगनगरमध्ये अन्नपूर्णा नवरात्रोत्सव उत्साहात

हंडीनिमगाव : नेवासा येथील गाडेनगरमध्ये श्री अन्नपूर्णा नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला अन्नपूर्णा शारदीय नवरात्र महोत्सव भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी महाआरतीने या उत्सवाची सांगता करण्यात आली. नवरात्रोत्सवानिमित्त देवीमातेची विधिवत पूजा, घटस्थापना, सकाळी व सायंकाळी आरती, विविध धार्मिक कार्यक्रम तसेच जागरण-गोंधळ अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना करण्यात आली. दररोजच्या आरतीसाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत होते. दांडिया आणि गरब्याने महोत्सवात रंगत महोत्सवादरम्यान दांडिया आणि गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने उत्सवाची शोभा अधिकच वाढली. दांडिया आणि गरबा नृत्यामुळे महोत्सवात विशेष रंगत आली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या सांस्कृतिक उपक्रमांचा आनंद घेतला. महिलांसाठी विविध सांस्कृतिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक एकोप्याचा संदेश या महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक एकोपा, महिला सहभाग आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला. संपूर्ण नवरात्रोत्सवाच्या काळात गाडेनगर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री अन्नपूर्णा नवरात्र उत्सव मंडळाचे पदाधिकारी, महिला, युवक आणि गाडेनगरमधील नागरिकांनी परिश्रम घेतले.

भानसहिवरा येथील श्रीराम विद्यालयाला २०२६ चा 'आदर्श विद्यालय पुरस्कार' प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथील श्रीराम हायस्कूलने शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि सर्वांगीण विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'आदर्श विद्यालय पुरस्कार' पटकावला. विजयादशमीच्या मंगल पर्वावर मिळालेल्या या सन्मानामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विद्यालयाच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

स्वर्गीय प्राचार्य विलासराव आठरे पाटील आणि स्वर्गीय श्रीमती जनाताई विलासराव आठरे पाटील यांच्या पावन स्मृतीप्रीत्यर्थ प्रदान करण्यात येणारा हा मानाचा पुरस्कार यंदा श्रीराम हायस्कूलला जाहीर झाला. विजया दशमीच्या निमित्ताने आयोजित दसरा मेळाव्यात संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे आणि सचिव विश्वासराव आठरे यांच्या हस्ते विद्यालयाला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीराम विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक शेंडगे, पर्यवेक्षक ऋषिनाथ बोरडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.श्रीराम विद्यालयाचा शैक्षणिक दर्जा, विद्यार्थ्यांची प्रगती, शाळेचा सर्वांगीण विकास आणि उपलब्ध भौतिक सुविधांचा विचार करून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल भावना व्यक्त करताना मुख्याध्यापक अशोक शेंडगे म्हणाले की हा पुरस्कार म्हणजे केवळ एका दिवसाचे यश नसून शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या



अथक परिश्रमांचे तसेच तसेच ध्येयनिष्ठेचे गोड फळ आहे. त्यांच्या या भावना विद्यालयाच्या यशामागील सामुहिक प्रयत्नांची साक्ष देणाऱ्या ठरल्या. श्रीराम हायस्कूलच्या या यशाबद्दल संस्थेच्या खजिनदार श्रीमती दीपलक्ष्मी म्हसे, उपाध्यक्ष भापकर, ज्येष्ठ विश्वस्त जी डी खानदेशे, सहसचिव मुकेशदादा मुळे, ज्येष्ठ विश्वस्त जयंत वाघ, संस्थेचे निरीक्षक राजळे आणि जावळे यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत विद्यालयाच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकांचे सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम आणि विद्यालयाच्या विकासासाठी केले जाणारे प्रयत्न यांना या पुरस्काराच्या माध्यमातून गौरव मिळाला आहे. विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर मिळालेल्या या सन्मानामुळे भानसहिवरे परिसरासह पंचक्रोशीतील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दुष्काळामुळे सत्कार स्वीकारणार नाही, गरजूंना मदत करा : कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांची अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मात्र, सध्या निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि सर्वसामान्य जनतेला सोसाव्या लागणाऱ्या संकटांच्या पार्श्वभूमीवर समर्थक कार्यकर्त्यांनी सत्कारासाठी येऊ नये. सत्कार आणि पुष्पगुच्छांवर खर्च करण्याऐवजी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या गोरगरीब, गरजू कुटुंबांना धान्य,पाणी उपलब्धता, पशुंधनाला चारा यासारखे मदतीचा हात द्यावा, असे संवेदनशील आवाहन कोल्हे यांनी केले आहे. बिपीन कोल्हे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त हार, पुष्पगुच्छ आणि अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्याची आदर्श परंपरा यापूर्वीही जपली आहे. समाजातील गरजू घटकांना मदत करून आनंदाचे क्षण अधिक अर्थपूर्ण करण्याचा त्यांचा दृष्टिकोन कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतरही त्यांनी सत्काराऐवजी दुष्काळग्रस्तांना मदत करण्याचे केलेले आवाहन त्यांच्या सामाजिक जाणिवेचे प्रतीक मानले जात आहे.

श्रीराम तरुण मंडळाच्या शारदोत्सवाची रावण दहनाने सांगता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीराम तरुण मंडळाच्या शारदोत्सवाची सांगता रावण दहनाने झाली. मंडळाचे हे ५८ वे वर्षे आहे. दरवर्षी दसऱ्यानिमित्त विजयादशमीच्या दिवशी श्रीराम मंदिर चौकातून रावणाची मिरवणूक पाटाच्या कडेला नेली जाते आणि त्या ठिकाणी शहरातील सर्व मान्यवरांचे उपस्थितीमध्ये रावण दहन केले जाते. यावर्षी रावणाच्या छातीवर लिहिलेले कुणाचा कुणावर अंकुश नाही, कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे हे बोधवाक्य लक्षवेधी ठरले.

काल सायंकाळी सात वाजता महात्मा गांधी पुतळ्यापासून सजवलेल्या ट्रॅक्टरवर शारदा देवीची मूर्ती ठेवून संगीताच्या तालावर भव्य आतिषबाजीने या मिरवणुकीचा प्रारंभ करण्यात आला. मंडळाचे संस्थापक अशोक उपाध्ये, राजेंद्र सोनवणे, सुरेश सोनवणे, गौतम उपाध्ये, प्रकाश चित्ते, राजेंद्र देवकर आदींच्या हस्ते श्रीफळ वाढवून मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला.

बेलापूर रोडवर कॅनल साईट लगत मंडळाचे वतीने रावणाचे दहन रात्री दहा वाजता करण्यात आले.यावेळी आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, मंडळाचे पदाधिकारी अशोक उपाध्ये,राजेंद्र सोनवणे, गौतम उपाध्ये, सुरेश सोनवणे, सतीश शहाणे,प्रकाश चित्ते, अयाज तांबोळी, बाळू क्षिरसागर, दिनेश अंभोरे, नंदू शिंदे, अतुल उपाध्ये,सिद्धार्थ उपाध्ये, सौ सपना उपाध्ये, सौ जयश्री उपाध्ये,राजेंद्र लचके आदी मान्यवरांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले.

डॉ. जी. के. ससाणे यांना डॉ. एम. एस. स्वामीनाथन पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



राहुरी : महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा डॉ. एम. एस. स्वामीनाथन पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील पुसा येथे आयोजित आठव्या जागतिक कृषी परिषदेत (नारी २०२५-२६) त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, केंद्रीय कृषिरथ महिला संस्थान, भुवनेश्वर आणि ग्रीमीट, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. संशोधन आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे कृषी क्षेत्राची प्रगती साधणे हा परिषदेचा मुख्य उद्देश होता. ग्रीमीट फाउंडेशनतर्फे कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

डॉ. ससाणे यांनी विस्तार शिक्षण संचालक म्हणून कार्यरत असताना कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. 'शेतकरी प्रथम' प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक म्हणून त्यांनी कानडगाव आणि तांभेरे येथे प्रशिक्षण कार्यक्रम तसेच प्रात्यक्षिके आयोजित करून विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा प्रसार केला. दूरदर्शन, आकाशवाणी आणि समाजमाध्यमांद्वारेही ते शेतकऱ्यांना कृषिविषयक माहिती देत आहेत.

कृषी विस्तार शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या ३० वर्षांच्या कार्यामुळे संशोधनातील तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली आहे. त्यांनी आचार्य पदवीच्या १७, तर पदव्युत्तर पदवीच्या ४० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांचे ६० संशोधनपर लेख विविध शास्त्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कार्याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही दखल घेण्यात आली आहे.

या सन्मानाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, सर्व संचालक आणि विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. ससाणे यांचे अभिनंदन केले.

जाहीर नोटीस

मालमत्ता खरेदी व्यवहाराची कागदपत्रे हरवली आहेत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अहिल्यानगर शहरातील नगर एमआयडीसी येथील महिंद्रा शोरूम ते केडगाव या प्रवासादरम्यान ५ जून २०२५ रोजी

१. श्री. रामदास किसन औताडे, रा. केडगाव, अहिल्यानगर.

२. प्रकाश मथुजी आंधळे, रा. डॉक्टर कॉलनी, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर यांच्या मालकीची मालमत्ता खरेदी व्यवहारासंबंधीची महत्त्वाची कागदपत्रे हरवली आहेत.

मालमत्तेचे वर्णन: जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

स. नं.-१०/१/५, क्षेत्र हे. आर.-०१.१५.०३, रु. पै.- ०.१७

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकी-वहिवाटीचे ० हे. २८.७५ आर क्षेत्राची मिळकत.

यांसी चतुःसीमा : पूर्वेस : स. नं. १० पैकी १/२ व १/३, दक्षिणेस : अंतर्गत रस्ता व स. नं. पैकी, पश्चिमेस : स. नं. १० पैकी १/४ व १/५ पैकी, उत्तरेस : लगत स. नं. ३२२ सदर कागदपत्रे कोणाला आढळून आल्यास ती खालील पत्त्यावर आणून द्यावीत. कागदपत्रे परत करणाऱ्या व्यक्तीस योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

पत्ता : श्री. रामदास औताडे, केडगाव, जि. अहिल्यानगर.

मोबाईल : ९९६०६०५९७७

कागदपत्रे सापडल्यास वरील क्रमांकावर संपर्क साधावा.

जाहीर प्रकटन

तमाम जनतेस विशेषतः नेवासा ता. नेवासा, जि. अहिल्यानगर परिसरातील जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल नामे रुख्मीनी रामकिसन वाघ यांचे पती नामे कै. रामकिसन रायभान वाघ रा.उस्थळ दुमाला, ता. नेवासा हे दि. ११.०८.२०२१ रोजी मयत झालेले आहे. मयत कै. रामकिसन रायभान वाघ यांना आमचे आशिल नामे रुख्मीनी रामकिसन वाघ, महेश रामकिसन वाघ, ज्योती ज्ञानेश्वर पडोळे हे कायदेशिर वारस आहे.

मयत कै. रामकिसन रायभान वाघ यांचे नावे स्वराज कंपनीचा 744 FE ट्रॅक्टर RTO NO. MH17V9837 चेसीस नं. QZCN40610015991 व इंजिन नं. 431022SLN4374 हे वाहन होते व आहे.

मयत कै. रामकिसन रायभान वाघ हे मयत झाल्यामुळे त्यांचे वारस नामे रुख्मीनी रामकिसन वाघ यांनी आर.टी.ओ. ऑफिस श्रीरामपुर येथे सदर वाहन त्यांचे नावावर करण्यासाठी अर्ज दाखल केलेला असुन तो प्रलंबित आहे. तरी मयत कै. रामकिसन रायभान वाघ यांचे वारसा बाबत कोणालाही काही हरकत असल्यास त्यांनी ८ दिवसांच्या आत आमचे कार्यालयाशी संपर्क साधावा. मुदतीत खुलासा/ म्हणने प्राप्त न झाल्यास आमचे आशिल हे वर नमुद वाहन त्यांचे नावावर करुन घेणार आहे याची नोंद घ्यावी. सदरचे जाहीर प्रकटन माहितीस्तव प्रसिध्द केले असे.

ठिकाण :- नेवासा
दिनांक :- १९.१०.२०२६

ॲडव्होकेट नेवासा कोर्ट
पी.एम. पाठे ॲडव्होकेट,
जिल्हा व सत्र न्यायालय नेवासा,
ता. नेवासा, जि. अहिल्यानगर,
मो.नं. ९८३४०८७७९१

कोकरे डीपीसाठी नवीन ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित; शेतकऱ्यांना दिलासा

दसऱ्याच्या मुहूर्तावर लोकार्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : जळगाव रस्त्यावरील कोकरे डीपीसाठी मंजूर करण्यात आलेला नवीन ६३ केव्ही क्षमतेचा विद्युत ट्रान्सफॉर्मर दसऱ्याच्या दिवशी कार्यान्वित झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या कामासाठी पुढाकार घेतल्याबद्दल राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले.

कोकरे डीपीवर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या वीजजोडण्या असल्याने ट्रान्सफॉर्मरवर क्षमतेपेक्षा अधिक भार येत होता. त्यामुळे तो वारंवार नादुरुस्त होत असे. अलीकडे पाणलोट क्षेत्रात पाणी अडविल्यामुळे सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढली होती. शेतकऱ्यांकडून पाणी उपसण्याचे प्रमाण वाढल्याने वीजपुरवठ्यावर ताण येत होता.



ही समस्या विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आला. वीजजोडण्या दोन डीपींवर विभागल्याने वीजपुरवठ्याची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे. याचा फायदा सिंचनासह चारा पिकांच्या लागवडीसाठी होईल. यावेळी डॉ. धनवटे यांनी विखे पाटील परिवाराचे आभार मानले. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी हा परिवार नेहमीच तत्पर असतो, असे त्यांनी सांगितले.

जलसंधारणाच्या कामांवर भर दुष्काळाकडे केवळ संकट म्हणून न पाहता जलसंधारणाची संधी म्हणून पाहिले पाहिजे, असे मत डॉ. धनवटे यांनी व्यक्त केले. परिसरातील नाल्यांचे खोलीकरण व स्वच्छता करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. नाल्यांतील गाळ, झाडेझुडपे आणि अडथळे दूर केल्यास पाणी साठविण्याची क्षमता वाढेल. त्यामुळे आगामी पावसाळ्यात त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चारा छावण्यांबाबत तातडीने निर्णय घ्या : थोरात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. तसेच इतर भागांतून किंवा शेजारील राज्यांतून जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा. शेतकऱ्यांसोबतच शेतमजुरांच्या पाठीशीही सरकारने खंबीरपणे उभे राहून ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करताना थोरात म्हणाले की, यंदा खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. सोयाबीनसारखी पिके शेतातून काढण्यासाठी चार ते पाच हजार रुपये खर्च येत असताना शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नाही. पाण्याअभावी आगामी रब्बी हंगामही अडचणीत आला आहे. येत्या काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनणार आहे. विशेषतः दुधाळ जनावरांचे संगोपन करणे शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. पिके नसल्याने शेतमजुरांच्या हाताला काम मिळत नाही. रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासनाने केवळ शेतकऱ्यांपुरते मर्यादित न राहता शेतमजुरांसाठीही मदतीचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले. शेजारील कर्नाटक राज्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही तातडीने निर्णय घेऊन चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. दुष्काळाच्या सुरुवातीलाच सरकारवर आरोप करण्याऐवजी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, असेही थोरात म्हणाले.

जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे महांकाळवडगाव, व श्रीरामपूर परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मौजे महांकाळवडगांव, ता. श्रीरामपूर, जि, अहिल्यानगर येथील गट नं. ५१. क्षेत्र ०१ हे ०० आर आकार ०२रु, ७९पै. ही शेतजमीन मिळकत श्री. विजय रामनाथ मोरे यांच्या मालकीची असल्याचे सांगण्यात येत आहे.

सदर मिळकतीशी संबंधित पूर्वीची उंबरी येथील वडिलोपार्जित शेतजमीन सन २०१२ च्या सुमारास विक्री करण्यात आली होती व त्या विक्रीतून प्राप्त झालेल्या रकमेतून मौजे महांकाळवडगांव येथील सदर मिळकत खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीच्या स्वरूपाबाबत तसेच त्यामधील आमचे अशील नामे सौ. सुनंदा विजय मोरे, श्री गौरव विजय मोरे व सौ. प्रीती प्रथमेश घाडेगावकर यांचा कायदेशीर हक्कांबाबत व हितसंबंधांबाबत हरकत असून, सदर मिळकत विक्री करण्याच्या प्रस्तावित व्यवहारास माझा स्पष्ट विरोध आहे.

त्यामुळे सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्था, बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही पक्षकाराने मिळकतीचे स्वरूप व त्यावरील कायदेशीर हक्कांची खातरजमा केल्याशिवाय खरेदी-विक्री, खरेदीखत, साठेखत, बक्षीसपत्र, गहाणखत, हस्तांतरण किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये.

सदर मिळकत खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीनी या जाहीर नोटिशीची नोंद घ्यावी. सदर मिळकतीबाबत आमच्या अशील यांचा कायदेशीर हक्क व हितसंबंध बाधित होणारा कोणताही व्यवहार करण्यात आल्यास, संबंधित व्यक्तीविरुद्ध सक्षम न्यायालयात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, अशा व्यवहारामुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर परिणामांची जबाबदारी संबंधित व्यवहार करणाऱ्या व्यक्तीवर राहील.

याची नोंद घेणेत यावी.

दि. २१/१०/२०२६

ॲड. के. पी. माने

जाहीर प्रकटन

तमाम जनतेस विशेषतः नेवासा ता. नेवासा, जि. अहिल्यानगर परिसरातील जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल नामे किशोर आनंदा शिरसाठ यांची पत्नी नामे कै. शोभा किशोर शिरसाठ रा.माका, ता. नेवासा हया दि. ३१.१०.२०२५ रोजी मयत झालेले आहे. मयत कै. शोभा किशोर शिरसाठ यांना आमचे आशिल नामे किशोर आनंदा शिरसाठ, नितीन किशोर शिरसाठ, निलेश किशोर शिरसाठ हे कायदेशिर वारस आहे.

मयत कै. शोभा किशोर शिरसाठ यांचे नावे महिंद्र कंपनीची बोलेरो RTO NO. MH17AA0218 चेसीस नं. MA1WF2GAK92G95889 व इंजिन नं. GA94G73632 हे वाहन होते व आहे.

मयत कै. शोभा किशोर शिरसाठ हया मयत झाल्यामुळे त्यांचे वारस नामे किशोर आनंदा शिरसाठ यांनी आर.टी.ओ. ऑफिस श्रीरामपुर येथे सदर वाहन त्यांचे नावावर करण्यासाठी अर्ज दाखल केलेला असुन तो प्रलंबित आहे. तरी मयत कै. शोभा किशोर शिरसाठ यांचे वारसा बाबत कोणालाही काही हरकत असल्यास त्यांनी ८ दिवसांच्या आत आमचे कार्यालयाशी संपर्क साधावा. मुदतीत खुलासा/ म्हणने प्राप्त न झाल्यास आमचे आशिल हे वर नमुद वाहन त्यांचे नावावर करुन घेणार आहे याची नोंद घ्यावी. सदरचे जाहीर प्रकटन माहितीस्तव प्रसिध्द केले असे.

ठिकाण :- नेवासा
दिनांक :- १९.१०.२०२६

ॲडव्होकेट नेवासा कोर्ट
पी.एम. पाठे ॲडव्होकेट,
जिल्हा व सत्र न्यायालय नेवासा,
ता. नेवासा, जि. अहिल्यानगर,
मो.नं. ९८३४०८७७९१

पान १ वरुन

पेट्रोल पंपावरील हुज्जतीतून बनावट नोटांचे बिंग फुटले!

या नोटा आल्या कुठून?

३६ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा संबंधित व्यक्तीकडे कशा आल्या, त्यांचा आणखी कुठे वापर झाला आहे का आणि या प्रकरणात इतरांचा सहभाग आहे का, हे तपासातील महत्त्वाचे प्रश्न आहेत. एका पेट्रोल पंपावरील प्रकारातून बनावट नोटांच्या मोठ्या जाळ्याचा धागा हाती लागतो का, याकडे आता लक्ष लागले आहे. संशयास्पद हालचाली ओळखून पोलिसांना मदत केल्याबद्दल आरटीपीसी इरफान शेख यांच्या सतर्कतेची चर्चा होत आहे.

.....

सहकार सम्राटांच्या खुर्चीला सर्वोच्च न्यायालयाचा धक्का!

चालणारे सत्ताकेंद्रीकरण रोखण्याच्या उद्देशाने बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा केल्या. त्यानुसार संचालकांच्या सलग दहा वर्षांच्या कार्यकाळाशी संबंधित पात्रतेचा मुद्दा महत्त्वाचा ठरला. या तरतुदींची अंमलबजावणी २०२१ पासून सुरू झाल्यानंतर राज्यात त्यावरून कायदेशीर व राजकीय संघर्ष निर्माण झाला.

संचालकांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळाच्या मर्यादेवरून राज्याच्या सहकार विभागाने वेगळी भूमिका घेतली होती. सहकार विभागाने २१ ऑगस्टच्या आदेशाडे केवळ दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला म्हणून सहकारी बँकांच्या संचालकांना निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याची राज्याच्या सहकार कायद्यात तरतूद नसल्याचे नमूद केले होते. तसेच, संबंधित केंद्रीय तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत राज्य सरकारची भूमिका मांडण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर संचालकांच्या पात्रतेचा प्रश्न न्यायालयीन पातळीवर पोहोचला. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केल्याने या विषयाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे सहकारी बँकांच्या आगामी निवडणुकांमध्ये संबंधित कायदेशीर तरतुदींचा नेमका परिणाम काय होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अहिल्यानगर जिल्हा बँकेवरही अनेक वर्षांपासून प्रस्थापित राजकीय नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे. त्यामुळे संचालकांच्या पात्रतेसंदर्भातील कायदेशीर तरतुदींचा परिणाम कोणावर होणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. आगामी निवडणुकीत जुन्या नेतृत्वाला संधी मिळणार की नव्या चेहऱ्यांना पुढे केले जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

सहकारी बँकांमधील दीर्घकालीन सत्ताकेंद्रीकरणाला आळा घालणे आणि नव्या नेतृत्वाला संधी उपलब्ध करून देणे, हा अशा निर्बंधांमागील महत्त्वाचा उद्देश मानला जातो. मात्र, प्रत्यक्षात या नियमांमुळे घराणेशाहीला लगाम बसणार की केवळ नेतृत्वाचे चेहरे बदलणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या नेत्यांना निवडणूक लढविण्यात अडचणी आल्यास ते कुटुंबातील सदस्यांना किंवा विश्वासू समर्थकांना पुढे करण्याची शयता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत संचालक मंडळावर प्रत्यक्षात नवे चेहरे दिसले, तरी बँकेच्या कारभारावरील जुन्या नेतृत्वाचा प्रभाव कायम राहू शकतो.

त्यामुळे केवळ संचालकांच्या कार्यकाळावर मर्यादा आणून सहकारातील राजकीय मक्तेदारी संपेल का, हा मूलभूत प्रश्न आहे. बँकांचा कारभार पारदर्शक होणे, निवडणुकांमध्ये स्पर्धेला वाव मिळणे आणि सामान्य सभासदांच्या हिताला प्राधान्य मिळणे, या बाबीही तितयाच महत्त्वाच्या ठरणार आहेत.

एकूणच, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे सहकार क्षेत्रातील प्रस्थापित सत्ताकेंद्रांसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. आता जिल्हा बँकांच्या निवडणुकांमध्ये कोण बाजी मारणार, कोणाला पर्यायी उमेदवार शोधावे लागणार आणि सहकारातील सत्तेची सूत्रे खरोखर नव्या नेतृत्वाकडे जाणार का, याचे उत्तर आगामी निवडणुकांतूनच स्पष्ट होईल.

पुतण्याने केलेल्या मारहाणीत चुलत्याचा मृत्यू, खुनाचा गुन्हा

गुजर, भाऊसाहेब विल्यम साठे, विनोद विजय वाघमारे, सर्व रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, या चार जणांवर राहुरी पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल केला होता. दरम्यान पोलिस पथकाने अक्षय मोकाटे व भाऊसाहेब साठे या दोघांना गजाआड केले. तर विकास गुजर याने न्यायालयातून तात्पूरता जामीन मिळवला आहे. मात्र विनोद वाघमारे हा अद्याप पसार आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहे. या प्रकरणी आता आरोपींवर वाढीव कलम लावून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान विलास मोकाटे यांच्यावर तब्बल वीस दिवस रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांना वाचविण्यासाठी डॉटरांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. मात्र दि. २१ ऑटोबर २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास विलास परसराम मोकाटे यांची मृत्यूशी सुरु असलेली झुंज थांबली आणि त्यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक मनोज आहेर हे करीत आहे.

साई संस्थानचा साईबाबा पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्ती भावाने संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिर्डी - साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने सोमवार दिनांक १९ ऑक्टोबर पासून सुरु असलेल्या श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाची सांगता आज काल्याच्या कीर्तनानंतर दहीहंडी फोडून झाली.

उत्सवाच्या सांगता दिनी पहाटे ०५.५० वाजता श्रींचे मंगलस्नान व त्यानंतर शिर्डी माझे पंढरपूर ही आरती झाली. सकाळी ०६.५० वाजता संस्थानचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे व त्यांच्या सुविद्य पत्नि सौ. वैशाली दराडे यांच्या हस्ते समाधी मंदिरात श्रींची पाद्यपुजा व संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वंदना गाडीलकर यांच्या हस्ते गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक पूजा करण्यात आली. सकाळी १०.०० वाजता ह.भ.प. सौ. राधिका गोपालकृष्ण कालेकर, कोल्हापुर यांचे काल्याचे कीर्तन झाले. काल्याच्या कीर्तनानंतर समाधी मंदिरात श्री साईबाबांचे समकालीन भक्त बायजाबाई कोते व तात्या पाटील कोते यांचे वंशज परीवारातील सदस्य अभिराज मिलिंद कोते यांच्या हस्ते दहिहंडी फोडण्यात आली. यावेळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, मंदिर विभाग प्रमुख विष्णु थोरात, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ स्थानिक समकालीन साई भक्तांचे वंशज अमृत गायके, राजेंद्र कोते, सुभाष कोते, अशोक गायके, विशाल कोते, अमोल गायके, मिलिंद शेळके, सचिन शिंदे, प्रसाद संकलेचा, संजय शिंदे, विलास कोते आदी उपस्थित होते.

त्यानंतर दुपारी १२.१० वाजता श्रींची माध्यान्ह आरती झाली. तर दुपारी ०१.०० ते ०३.०० सौ. पद्मावती पारेकर, निनाद ग्रूप, पुणे यांचा 'भक्ती संगीत' कार्यक्रम, दुपारी ०३.३० ते ०५.३० वा. पद्मश्री विजय घाटे यांचा 'तालचक्र' कार्यक्रम संपन्न झाला. तसेच सायंकाळी ०६.०० वाजता श्रींची धुपारती, सायं. ०७.०० ते ०९.३० यावेळेत श्री राजेश कृष्णा खर्डे (वेसावकर), मुंबई यांचा 'परंपरा साईंची' हा कार्यक्रम श्री हनुमान मंदिराशेजारील श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपातील स्टेजवर रात्रौ १०.०० वाजता श्रींची शेजारती पार पडली .



हा उत्सव यशस्वरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे, तदर्थ समितीचे सदस्य तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, व मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, सर्व प्रशासकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कोपरगाव रेल्वे स्टेशनवर स्वतंत्र आरपीएफ ठाणे द्या; आ. आशुतोष काळेंची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत येणाऱ्या लाखो साईभक्तांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी कोपरगाव रेल्वे स्थानकावर पूर्णवेळ स्वतंत्र रेल्वे सुरक्षा बलाचे ठाणे मंजूर करून तिथे रेल्वे पोलीस निरीक्षकांची तात्काळ नियुक्ती करावी अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी मध्य रेल्वे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांच्याकडे लेखी निवेदनाडरे केली आहे. दिलेल्या निवेदनात आ. आशुतोष काळे म्हणाले कि, कोपरगावला ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभला असून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात देशभरातून साधू-संत आणि लाखो भाविक कोपरगावमार्गे शिर्डीला ये-जा करणार आहेत. साईनगर शिर्डी टर्मिनस स्थानकावर इंजिन बदलण्याच्या तांत्रिक मर्यादा असल्यामुळे मुख्य लाईनवरील अमृत भारत दर्जा प्राप्त असलेले कोपरगाव रेल्वे स्थानक या काळात मुख्य केंद्र ठरणार आहे. कुंभमेळ्यादरम्यान नाशिकमध्ये येणाऱ्या लाखो भाविकांपैकी २५ टक्के भाविक शिर्डी व कोपरगाव परिसरातील देवस्थानांना भेट देतात. कुंभमेळा काळात शिर्डीत दररोज १.५ लाख भाविक तर कोपरगाव स्थानकावर दररोज १० ते १५ हजार प्रवासी येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांची गर्दी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ओळखून कोपरगाव स्थानकावर स्वतंत्र आरपीएफ ठाणे उभारणे अत्यंत गरजेचे आहे. आ. आशुतोष काळे यांनी मार्च २०२७ पूर्वी आरपीएफ ठाणे उभारून तिथे १ पोलीस निरीक्षक, १ उपनिरीक्षक, १ सहाय्यक उपनिरीक्षक, १० हेड कॉन्स्टेबल आणि ११ कॉन्स्टेबल असे एकूण २४ जवान आणि याव्यतिरिक्त कॉन्स्टेबल संवर्गातील १५ कायमस्वरूपी पदे मंजूर करण्याची मागणी केली आहे. तसेच जवानांच्या राहण्यासाठी स्थानक परिसरात २० खाटांचे सर्वसोयीयुक्त स्वतंत्र निवासस्थान उभारण्यासाठी २.४ कोटी रुपयांचा प्रस्ताव मध्य रेल्वे प्रधान मुख्य अभियंत्यांकडे सादर करण्यात आला आहे. कुंभमेळा सुरू होण्यापूर्वीच नवनियुक्त आरपीएफ अधिकाऱ्यांना स्थानिक भौगोलिक परिस्थिती व कार्यपद्धतीचा अंदाज यावा यासाठी तात्काळ आरपीएफ ठाणे उभारण्याची मागणी आ. आशुतोष काळे यांनी मध्य रेल्वे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांच्याकडे लेखी निवेदनाडरे केली आहे.

आ. सतीश चव्हाण मोठ्या मताधिक्याने निवडून येणार : आ. प्रशांत बंब



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण महाराष्ट्रातून मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असा विश्वास भाजपचे आ. प्रशांत बंब यांनी व्यक्त केला.राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप व शिवसेना महायुतीचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ गंगापूर येथे आज महायुतीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून गंगापूर – खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गंगापूरचे नगराध्यक्ष संजय जाधव, प्रदेश सरचिटणीस दिलीप बनकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक शेषराव जाधव, माजी संचालक नंदकुमार गांधीले, जि.प.समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, भाजपा तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण, शिवसेना तालुकाप्रमुख दिलीप निरफळ, अनिल चव्हाण, जि.प.माजी सभापती संतोष जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष कल्याण गायकवाड, पंचायत समिती सदस्य लक्ष्मणभाऊ सांगळे, प्रदीप सोनवणे, दादासाहेब जगताप, शुभम बोऱ्हाडे, माजी पंचायत समिती सदस्य संतोष काळवणे,.सुरेश शिंदे, गंगापूरचे उपनगराध्यक्ष अमोलदादा जगताप, भाजपा युवा मंचचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव आदीसह तीन्ही पक्षाचे नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करतांना आमदार प्रशांत बंब म्हणाले की, प्रत्येक बुथवर तीनही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आगामी काळात मेहनत घेऊन जास्तीत जास्त मतदान आमदार सतीश चव्हाण यांना कसे होईल यासाठी प्रयत्न करावेत. प्रचार कार्यात काही मदतीसाठी मला केंव्हा कॉल करा, मी उपलब्ध आहे असे सांगितले,

बोरगावला मूलभूत सुविधांचा अभाव,अंगणवाडीला हक्काची खोली नाही

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील सुरेगाव (गंगा) व बोरगाव ही संयुक्त ग्रुप ग्रामपंचायत असून, सुरेगावपासून अवघे अडीच किलोमीटर अंतरावर असलेल्या बोरगावमध्ये आजही मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे चित्र समोर आले आहे.अंगणवाडीला हक्काची खोली नाही, शाळेच्या सुविधांचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे

बोरगावातील ९५ टक्क्यांहून अधिक कुटुंबे आदिवासी समाजातील असून,अनेक कुटुंबे आर्थिक दृष्ट्या गरीब आहेत असे असतानाही गावात अंगणवाडी साठी स्वतंत्र इमारत नाही, गेल्या वर्षभरापासून नळाला पाणी येत नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे, तर अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था आणि पथदिव्यांचा अभाव यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत असताना बोरगावसारख्या गावातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष का करावा लागतो असा सवाल उपस्थित होत आहे.


गावातील चिमुकल्या बालकांसाठी स्वतंत्र अंगणवाडी खोली उपलब्ध नसल्याने



सध्या देवीच्या मंदिरात अंगणवाडी भरवावी लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. अनेक वर्षांपासून हा प्रश्न कायम असल्याने बालकांच्या शिक्षणाचा आणि सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. गावातील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या जिल्हा परिषद शाळेतही विद्यार्थ्यांना पुरेशा आणि योग्य सुविधांचा अभाव असल्याची तक्रार आहे. त्यातच वर्षभरापासून पाणीपुरवा होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे पिण्याच्या पाण्यासारख्या अतवश्यक सुविधेसाठी नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. बोरगावच्या विकासासाठी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन अंगणवाडी इमारत, नियमित पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, स्मशानभूमी, पथदिवे आणि शाळेतील आवश्यक सुविधांसाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे. आता प्रशासन या प्रश्नांची दखल कधी घेणार आणि बोरगावच्या विकासाला गती कधी मिळणार, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

निधनवार्ता

रामकृष्ण आठरे



अहिल्यानगर : जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामकृष्ण बाबुराव आठरे (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. स्व.रामकृष्ण आठरे यांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागात मुख्याध्यापक म्हणून सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष रेश्माताई आठरे यांचे ते सासरे तर गजराजचे सुरेश चव्हाण यांचे ते व्याही होत.

अण्णासाहेब मुंगसे



संगमनेर : देवकवठे येथील रहिवासी व भारतीय सैन्यांमध्ये २२ वर्ष सेवा देणारे माजी सैनिक अण्णासाहेब गणपत मुंगसे यांचे आजाराने (वय ५७) निधन झाले.काश्मीर ,अरुणाचल प्रदेश, हिमालय पंजाब अशा राज्यांबरोबरच श्रीलंकेमध्येही ते सैन्याबरोबर गेले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी शिर्डी येथे साई संस्थान मध्ये ही काही काळ आपली सेवा दिली.त्यांच्या पश्चात आई, वीरपत्नी सविता, मुलगा दोन मुली, भाऊ असा परिवार आहे.

कुकाण्यात रंगला स्त्री सन्मानाचा सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : घर, संसार, शेती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असणाऱ्या ग्रामीण महिलांना स्वतः साठी आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, आपल्या भावना व्यक्त करता याव्यात आणि सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने आयोजित 'होम मिनिस्टर – सोहळा स्त्री सन्मानाचा' या कार्यक्रमाला कुकाणा पंचक्रोशीतील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आमदार श्री. विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या संकल्पनेतून शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त डॉ. तेजश्रीताई सिद्धांत नवले-लंघे पाटील यांच्या आयोजनातून रविवारी (दि. १८ ऑक्टोबर) साई श्रद्धा मंगल कार्यालयात हा सोहळा पार पडला.

सकाळी ११ वाजता सुरू झालेला कार्यक्रम सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत उत्साहात रंगला. आमदार



विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात 'होम मिनिस्टर' फेम शुभम मस्के यांनी आपल्या खुमासदार शैलीत विविध मनोरंजक खेळ व स्पर्धा घेतल्या. महिलांनी नृत्य, खेळ आणि स्पर्धांमध्ये मनमोकळेपणाने सहभाग घेतला. हास्यविनोद, टाळ्यांचा कडकडाट आणि आकर्षक बक्षिसांमुळे दिवसभर आनंदाचे वातावरण होते.

आकर्षक बक्षिसांनी महिलांचा गौरव कार्यक्रमात बंपर लकी ड्रॉमधील इलेक्ट्रिक स्कूटी सकोमलताई खंडागळे यांनी पटकावली. फ्रिज अनिताताई मोटकर, एलईडी टीव्ही प्रगतीताई डावखर, एक ग्रॅम लाँग गंठण प्रियांकाताई आंबीलवादे, वॉटर प्युरिफायर अमृताताई खराडे, पंखा अर्चनाताई ससाणे, मिक्सर सोनालीताई लोखंडे, तर उत्तेजनार्थ पैठणी साडी उषाताई पवार यांना मिळाली. विजेत्या महिलांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. अशा स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल रत्नमाला लंघे पाटील यांचे विशेष आभार मानले. या उपक्रमाचे आयोजन डॉ. तेजश्रीताई सिद्धांत नवले-लंघे पाटील यांनी केले होते. यावेळी कुकाणा पंचक्रोशीतील महिला, ग्रामस्थ, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

गुरुवार दि. २२ ऑक्टोबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त: १२३ १६९ ११४ — ६-० — १४५ २८० ५५० — ६४-३०-१९-२५-०७

कल्याण

उदय-अस्त: १२९ ४८० ६६० — २-३ — १२० ४९० ६७० — २६-९३-५१-०८-३७

मुंबैम (मेन)

उदय-अस्त: १२५ २६० ४४० — ८-६ — १५० ३६७ ३३० — ८५-२६-०१ ४३-६७

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	2 5 9 — 60 — 5 5 0	5 9 0 — 42 — 2 2 8	3 5 8 — 62 — 3 9 0	4 0 0 — 47 — 8 9 0	1 6 0 — 70 — 4 8 8
03/08/2026 to 07/08/2026	2 3 4 — 90 — 5 6 9	1 7 0 — 85 — 1 5 9	3 3 8 — 42 — 1 2 9	4 6 0 — 09 — 4 7 8	3 7 0 — 05 — 3 4 8
10/08/2026 to 14/08/2026	5 7 7 — 99 — 2 3 4	2 3 0 — 53 — 1 4 8	2 5 0 — 70 — 2 3 5	3 5 5 — 39 — 1 3 5	1 3 3 — 76 — 3 5 8
17/08/2026 to 21/08/2026	2 4 0 — 60 — 4 6 0	2 7 8 — 73 — 3 4 6	1 1 6 — 82 — 4 8 0	1 5 6 — 23 — 7 7 9	4 4 9 — 77 — 1 7 9
24/08/2026 to 28/08/2026	3 6 0 — 96 — 7 9 0	2 5 5 — 23 — 2 2 9	7 8 9 — 42 — 2 3 7	4 5 0 — 98 — 4 4 0	2 6 6 — 41 — 2 9 0
31/08/2026 to 04/09/2026	1 4 9 — 43 — 6 7 0	1 7 0 — 81 — 5 6 0	1 5 9 — 52 — 3 3 6	6 9 0 — 50 — 2 3 5	5 7 7 — 99 — 1 3 5
07/09/2026 to 11/09/2026	6 8 0 — 47 — 5 5 7	2 2 8 — 27 — 1 2 4	5 7 0 — 26 — 3 5 8	1 1 2 — 43 — 7 7 9	4 4 5 — 33 — 6 8 9
14/09/2026 to 18/09/2026	7 8 9 — 47 — 1 2 4	3 3 6 — 20 — 1 3 6	7 9 9 — 56 — 1 7 8	6 8 0 — 42 — 3 4 5	3 9 9 — 16 — 7 9 0
21/09/2026 to 25/09/2026	3 9 0 — 25 — 3 4 8	4 5 7 — 62 — 1 2 9	4 8 0 — 23 — 5 9 9	1 6 6 — 30 — 4 7 9	1 5 0 — 60 — 2 8 0
28/09/2026 to 02/10/2026	6 6 9 — 19 — 1 3 5	1 3 7 — 18 — 2 7 9	2 6 0 — 84 — 2 5 7	6 6 0 — 29 — 1 2 6	3 6 9 — 84 — 7 7 0
05/10/2026 to 09/10/2026	1 4 0 — 57 — 2 5 0	4 5 9 — 85 — 1 6 8	1 3 0 — 48 — 5 6 7	4 6 9 — 99 — 1 2 6	5 5 8 — 84 — 5 9 0
12/10/2026 to 16/10/2026	1 6 0 — 79 — 5 6 8	2 9 0 — 11 — 6 6 9	1 2 2 — 58 — 1 8 9	1 3 0 — 46 — 1 2 3	2 5 7 — 42 — 4 8 0

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
३४५	३६९
२१	८४
६७८	३५६

त्र्यंबकेश्वरमध्ये फिरते वैद्यकीय पथक सुरू

प्राथमिक आरोग्यसेवेला मिळणार बळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नाशिक : त्र्यंबकेश्वर परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने पॅनासोनिक लाईफ सोल्युशन्स इंडिया कंपनीने फिरते वैद्यकीय पथक सुरू केले आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत ज्युबिलंट भारतीया फाऊंडेशनच्या भागीदारीत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या पथकाच्या माध्यमातून नागरिकांना वैद्यकीय सल्ला, आरोग्य तपासणी, सामान्य आजारांवरील उपचार आणि आवश्यक औषधे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळा विभागाचे मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते १५ ऑक्टोबर रोजी या फिरत्या वैद्यकीय पथकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्थानिक प्रशासनाचे प्रतिनिधी, त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि कंपनीच्या व्यवस्थापनातील सदस्य उपस्थित होते. या वैद्यकीय



पथकाडरे विषाणूजन्य संसर्ग, हंगामी आजार आणि त्वचेच्या किरकोळ विकारांचे निदान व उपचार केले जाणार आहेत. तसेच नागरिकांची रक्तदाब आणि रक्तातील साखरेची तपासणी करून संभाव्य आजारांचे लवकर निदान करण्यावर भर दिला जाणार आहे. सामान्य आजारांसाठी आवश्यक औषधेही उपलब्ध करून दिली जातील. गंभीर आजार असलेल्या किंवा विशेष उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना जवळच्या सरकारी अथवा नागरी रुग्णालयात पाठविण्यात येणार आहे. पॅनासोनिक लाईफ सोल्युशन्स इंडियाचे मुख्य मानव संसाधन अधिकारी आकाश सांगोले म्हणाले की, प्रत्येक कुटुंबाला वेळेवर आणि आवश्यक आरोग्यसेवा मिळणे महत्त्वाचे आहे. त्र्यंबकेश्वरमधील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवा जवळ उपलब्ध करून देणे आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांची संख्या वाढण्याची अपेक्षा आहे. या काळात स्थानिक आरोग्यसेवा व्यवस्थेला बळ देण्यासोबतच नागरिकांच्या दीर्घकालीन आरोग्य आणि कल्याणासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

खा. लंके विरुद्ध राहुल शिंदे यांची पारनेर सोसायटी मतदारसंघातून लढत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

निघोज : जिल्हा सहकारी बँकेची संचालक मंडळाची निवडणूक दि. २ नोव्हेंबर रोजी होत असून बुधवार दि.२१ रोजी उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी निवडणूकीचे चित्र स्पष्ट झाले असून पारनेर सोसायटी मतदारसंघातून खासदार निलेश लंके विरुद्ध राहुल शिंदे हे लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सोसायटी मतदारसंघातून लंके, शिंदे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हा सहकारी बँकेच्या माजी संचालिका गीतांजली शेळके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र बुधवार दि.२१ रोजी आमदार दाते व श्रीमती शेळके यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने लंके शिंदे लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. सोसायटी मतदारसंघात १०४ मतदार असून खासदार लंके गटाकडे ४८ मतदार असल्याचा दावा त्यांचे कार्यकर्ते करीत आहेत. तसेच विखे पाटील थोरात सहमती एक्स्प्रेसचे उमेदवार शिंदे यांच्याकडे आमदार दाते, जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील तसेच श्रीमती शेळके यांचे हक्काचे मतदारांची संख्या ५६ पेक्षा जास्त असल्याचा दावा शिंदे यांचे कार्यकर्ते करीत आहेत. खासदार लंके व राहुल शिंदे हे पारंपरिक विरोधक आहेत. शिंदे हे नामदार विखे पाटील यांचे कट्टर समर्थक असून जिल्हा परिषद सुपा गटातील निवडणुकीत अनेक वेळा लंके व शिंदे यांची लढत झाली आहे मात्र यामध्ये एकदाही शिंदे हे विजयी न होता सातत्याने पराभव त्यांना पाहावयास मिळाला आहे. हेच पारंपरिक विरोधक आता जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत लढत असून विखे पाटील यांचे पाठबळ व आमदार दाते, झावरे पाटील व श्रीमती शेळके यांचा पाठिंबा शिंदे यांना विजयी करणार असा दावा त्यांचे कार्यकर्ते करीत आहेत. तर खासदार निलेश लंके हे किमान पाच मतांनी विजयी होतील असा दावा लंके यांचे कार्यकर्ते करीत आहेत. जवळपास सर्वच मतदार सहलीसाठी रवाना झाली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. मात्र पारनेर सोसायटी मतदारसंघातील ही खासदार लंके विरुद्ध राहुल शिंदे ही लढत चुरशीची होणार असल्याची चर्चा जिल्ह्यात होत आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या माजी संचालिका गीतांजली शेळके यांनी सोसायटी मतदारसंघातून लढण्याची तयारी पूर्ण केली होती. सहमती एक्स्प्रेसच्या नेतेमंडळींना भेटून मीच लढणार आणी विजयी होणार असा दावा त्या करीत होत्या. त्यांनी महिला मतदारसंघातून सुद्धा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र दि.२१ रोजी लवकर त्यांनी तो अर्ज मागे घेतल्याने ताईंना सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी मिळणार हेच स्पष्ट झाले होते मात्र विखे पाटील थोरात यांच्या जागावाटपामध्ये पारनेरची जागा विखे पाटील यांच्याकडे गेल्याने श्रीमती शेळके यांना माघार घ्यावी लागली. याबद्दल तालुक्यातील जनतेतून नाराजी व्यक्त होत असून जिल्हा सहकारी बँकेच्या एक कार्यक्षम संचालिका म्हणून काम करणाऱ्या श्रीमती शेळके या पुढील पंचवार्षिक मध्ये संचालीका नाहीत याबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे.





लढत लंके विरुद्ध शिंदे असली तरी खासदार लंके यांचा पराभव करण्यासाठी विखे पाटील ताकद पणाला लावणार असल्याने विखे पाटील थोरात सहमती एक्स्प्रेसचे ईतर नेतेमंडळी विशेष करुन आमदार दाते, झावरे पाटील व श्रीमती शेळके यांच्या गटातील मतदारांचा ऐक्य कशाप्रकारे अबाधित राखून ते राहुल शिंदे यांना मदत करतात काय यावर शिंदे यांच्या विजयाचे समीकरण अवलंबून आहे. मात्र खासदार लंके यांचे कार्यकर्ते ४८+६ आम्हाला सहज शक्य असून विजय आमचाच असा दावा कार्यकर्ते करीत आहेत.

दखल

केडगाव बायपासवर अपघातातील दुचाकी चोरीचा प्रयत्न; चोरटा जेबंद

अहिल्यानगर : केडगाव बायपास परिसरातील हॉटेल वंदनसमोरील पेट्रोल पंपजवळ उभ्या असलेल्या अपघातातील दुचाकी चोरून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या एकास फिर्यादी व त्याच्या मित्राने नागरिकांच्या मदतीने रंगेहाथ पकडले. ही घटना मंगळवारी रात्री ११:५० वाजण्याच्या सुमारास घडली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी गौरव पांडुरंग बेल्हेकर (वय ३४, रा. नवीन गावठाण केडगाव) हे त्यांचे मित्र उदय अविनाश भारंबे यांच्यासह रात्री दुचाकीने पेट्रोल भरण्यासाठी जात होते. यादरम्यान, नगर-पुणे रोडवरील कृष्णा वॉशिंग सेंटर शेजारी, केडगाव येथे गत १४ ऑक्टोबर रोजी झालेल्या अपघातातील उदय भारंबे यांची चेतक दुचाकी (क्र. एमएच १६ डीआर ९५७७) लावलेली होती. ही दुचाकी एक इसम ढकलून ने जात असल्याचे व त्याचे दोन अनोळखी साथीदार अन्य एका दुचाकीवरून (क्र. एमएच १६ डीएन ५९२६) जात असल्याचे फिर्यादीच्या निदर्शनास आले. फिर्यादी व त्यांच्या मित्राने तात्काळ गाडी अडवून हटकले असता, आरोपींनी गाडी जागीच सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क असलेल्या फिर्यादी व मित्राने एकाला जागीच पकडले. चौकशी केली असता, पकडलेल्या आरोपीने त्याचे नाव सुशांत शिवाजी निक्रड (वय २१, रा. पाईपलाईन रोड, त्रिमूर्ती चौक तागडवस्ती, अहिल्यानगर) असल्याचे सांगितले. याप्रकरणी फिर्यादी गौरव बेल्हेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सुशांत निक्रड आणि त्याचे दोन अनोळखी साथीदार यांच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात कायदेशीर गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

एमआयडीसी परिसरात अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आजोबाविरोधात गुन्हा

अहिल्यानगर : एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उदरमल गावात एका आठ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पीडित चिमुरडीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून चुलत आजोबा असलेल्या नराधमाविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यासह विविध कलमांनुसार गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपी आजोबाचे नाव आहे. मंगळवारी (दि. २०) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास उदरमल येथील राहत्या घर परिसरात ही घटना घडली. आरोपी नागनाथ पालवे याने आठ वर्षांच्या नातीला आपल्या पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनात फसवून बसवले. त्यानंतर तिच्या अंगावर हात फिस्कटत विनयभंग केला. या प्रकारानंतर चिमुरडीने घडलेला प्रकार आपल्या आईला सांगितला. आईने तातडीने पाऊल उचलत एमआयडीसी पोलीस ठाणे गाठले आणि आरोपी आजोबाविरोधात कायदेशीर फिर्याद दिली. फिर्यादीनुसार पोलिसांनी आरोपी याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेचे कलम ७४ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो ॲक्ट) २०१२ च्या कलम ८ आणि १२ नुसार गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक थोरात व पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे करीत आहेत.

संत निरंकारी मिशनचा ७९वा वार्षिक संत समागम शुक्रवार पासून

अहिल्यानगर : सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या छत्रछायेखाली निरंकारी मिशनच्या वतीने चार दिवसीय ७९वा वार्षिक संत समागमाचे भव्य आयोजन निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे शुक्रवार (दि.२३) ते सोमवार (दि.२६ ऑक्टो.) पर्यंत होणार असून संत समागमात नगर शहर व नगर जिल्ह्यातून तसेच अहिल्यानगर क्षेत्र(३६अ) अंतर्गत येणाऱ्या शाखा बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आदि ठिकाणाहून हजारो भक्तगण उद्या रवाना होणार असल्याची माहिती मिशनचे अहिल्यानगर झोन प्रमुख हरीश खुबचंदानी यांनी दिली. या समागमात प्रत्येक पाऊल मानव कल्याणाच्या दिशेने अग्रेसर होईल, प्रत्येक भाव समर्पणात परिवर्तीत होईल आणि प्रत्येक हृदय प्रेमाच्या त्या दिव्यज्योतीने प्रकाशित होईल जी मानवतेला एकत्व, सदभावना आणि प्रभूभक्तिच्या सूत्रात बांधण्याचा संदेश देते, जिथे ब्रह्मज्ञानाने चेतना जागृत होते.

पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धांमध्ये यश

अहिल्यानगर : पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. बुद्धिबळ, कुस्ती, नेमबाजी, पोहणे, मैदानी खेळ, बास्केटबॉल आणि स्केटिंग,आईसस्टॉक, अशा विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणे विभागांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये १४ वर्षांखालील गटात आर्यन देवकर याने बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. कृष्णा रोहोकले याने कुस्तीमध्ये, तर आरुष इंगळे याने नेमबाजीमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. आरुषने गोळाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत दुहेरी यश संपादन केले. श्रावणी देशमुख हिने पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले. मैदानी स्पर्धांमध्ये स्वरदा तिपोळे, आरुषी गायकवाड, काव्या झावरे आणि संस्कृती गाडगे यांनी रिले स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. स्वरदा तिपोळे हिने लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला.

तरुणाचा खून करून मृतदेह मुळा धरणाच्या बॅकवॉटरमध्ये फेकला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : नाजूक प्रकरणातून कमालपूर (ता. श्रीरामपूर) येथील तरूणाचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह मुळा धरणाच्या बॅकवॉटर कालव्यात फेकून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गणेश मच्छिंद्र गायकवाड (वय ३२) असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे. गणेशचा मृतदेह मंगळवारी (२० ऑक्टोबर) दुपारी वांबोरीजवळील कुक्कडओढा (ता. राहुरी) गावाच्या शिवारात आढळून आला. एमआयडीसी पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा शासकीय रूग्णालयात शवविच्छेदन केले. मयत गणेश यांचा भाऊ प्रदीप मच्छिंद्र गायकवाड (वय ३४, हल्ली रा. विहा मांडवा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, मुळ रा. कमालपूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार योगेश राजेंद्र जाधव आणि महेश राजेंद्र जाधव (दोघे रा. शिंगवे नाईक, ता. अहिल्यानगर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. फिर्यादीनुसार, त्यांचा लहान भाऊ गणेश याने हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेतले होते. तो पुणे येथे नोकरी करून राहत होता. त्याला दारू पिण्याचे व्यसन होते. दारू प्यायल्यानंतर तो कुटुंबीयांशी वाद घालत असे. गणेश याचे एका महिलेसोबत लग्नापूर्वी संबंध होते. १७ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास एका अनोळखी क्रमांकावरून प्रदीप यांना फोन आला. गणेश दारू पिऊन शिंगवे नाईक येथील एका घरात शिरत असताना आढळल्याचे आणि त्याला पकडून ठेवल्याचे फोन करणार्याने सांगितले. दरम्यान, प्रदीप यांनी शिंगवे नाईक गावातील नागरिकांकडे चौकशी केली असता, गणेश घरात शिरताना आढळल्याने योगेश जाधव व महेश जाधव यांनी त्याला मारहाण करून ठार मारले आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह मुळा धरणाच्या बॅकवॉटर कालव्यात टाकल्याची माहिती मिळाल्याचे प्रदीप यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनचे निदर्शने

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : मंजूर सौर ऊर्जा क्षमता वाढीची नोंद प्रणालीमध्ये अद्ययावत न केल्याने तसेच चुकीच्या नोंदींमुळे अवाजवी वीजबिले आकारली जात असल्याचा आरोप करत महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने निदर्शने करण्यात आली. या प्रकरणातील तक्रारदार राहुल आढाव यांनी बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी शहरातील महावितरण विभागीय कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. मंजूर पाच किलोवॅट सौर क्षमतेची अधिकृत नोंद करून सुधारित वीजबिल द्यावे, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा हिशोब करावा आणि सुरक्षा ठेवेसंदर्भातील नोंदी दुरुस्त कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात ड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, राहुल आढाव, आनंदा आढाव, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, ऋषिकेश आढाव आदी सहभागी झाले होते.



राहुल आढाव यांनी आपल्या घरावरील मूळ तीन किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा यंत्रणेत अतिरिक्त दोन किलोवॅटची वाढ मंजूर करून घेतली होती. त्यामुळे त्यांच्या सौर यंत्रणेची एकूण मंजूर क्षमता पाच किलोवॅट झाली होती. मात्र, महावितरणचे कर्मचारी, अधिकारी आणि संबंधित व्हेंडर यांच्या निष्काळजीपणामुळे ही वाढ वीज वितरण प्रणालीमध्ये वेळेत अद्ययावत करण्यात आली नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

या चुकीच्या नोंदींमुळे मंजूर पाच किलोवॅट क्षमतेऐवजी दोन किलोवॅट सौर क्षमता नोंदविण्यात आली. परिणामी, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा अपेक्षित लाभ मिळाला नसल्याचे आढाव यांचे म्हणणे आहे. याशिवाय, ग्राहकाची सुरक्षा ठेवही वीजबिलात समायोजित करण्यात आली असून अवाजवी बिले पाठविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकरणात आढाव यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत (आरटीआय) संबंधित माहिती मागविली होती. मात्र, उपविभागीय कार्यालयाकडून अपूर्ण उत्तरे देण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, शहर व ग्रामीण विभाग, अहिल्यानगर यांनी ९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकाऱ्यांना सात दिवसांच्या आत सौर यंत्रणेचा कमिशनिंग अहवाल, मीटर रीडिंग आणि बिल दुरुस्ती करून सुधारित बिल देण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, या आदेशानंतरही संबंधित कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप आढाव यांनी केला आहे. यासाठी त्यांनी सलग तीन लेखी स्मरणपत्रे दिल्याचेही सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही प्रश्न मार्गी लागत नसल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. मंजूर पाच किलोवॅट सौर क्षमतेची अधिकृत नोंद करून मागील सुमारे दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा हिशोब जोडून सुधारित वीजबिल तातडीने द्यावे, वीजबिलात विनाकारण समायोजित करण्यात आलेली सुरक्षा ठेव दुरुस्त करून त्याबाबत योग्य कार्यवाही करावी, प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाचे सात दिवसांत पालन न करणाऱ्या संबंधित कर्मचारी, अधिकारी आणि व्हेंडर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

रेणुकामाता देवस्थानात २५ फुटी रावणाचे दहन

ढोल-ताशांचा निनाद, घोड्यांचा ठेका अन् नेत्रदीपक आतषबाजी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : विजयादशमी निमित्त एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्टच्या वतीने २५ फुटी रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. रावण दहनाचा थरार अनुभवण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी देवस्थानच्या मैदानात मोठी गर्दी केली होती. रावण दहनानंतर करण्यात आलेल्या नेत्रदीपक आतषबाजीने संपूर्ण परिसर उजळून निघाला. 'बोलो सियारामचंद्र की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि उत्साहपूर्ण वातावरणात विजयादशमीचा सोहळा साजरा करण्यात आला.

विजयादशमीनिमित्त देवस्थान परिसरात धार्मिक आणि सांस्कृतिक उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिरात श्री रेणुकामातेची विधिवत आरती करण्यात आली. त्यानंतर वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. हलगी आणि संबळच्या निनादाने परिसरात उत्साह संचारला होता. पारंपरिक वाद्यांच्या तालावर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि भाविकांनी ठेका धरत मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या मिरवणुकीतील तालावर नृत्य करणाऱ्या घोड्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. तसेच पांडा आणि चिपांझीच्या कार्टून पात्रांनी बालगोपालांचे मनोरंजन केले. लहान मुलांसह नागरिकांनीही या मिरवणुकीचा आनंद घेतला. मंदिर परिसरातून



सुरू झालेल्या या मिरवणुकीमुळे विजयादशमीच्या उत्सवाला अधिकच रंगत आली. मिरवणुकीनंतर मंदिरासमोरील मैदानात उभारण्यात आलेल्या २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या हस्ते दहन करण्यात आले. यावेळी श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो भाविक उपस्थित होते.

महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करून रक्तक्षयाबाबत जनजागृती करा : डॉ. बोरुडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग व प्रभाग समिती कार्यालय क्रमांक ३ यांच्या वतीने एकात्मिक आरोग्य समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. तसेच गरोदर मातांच्या आरोग्याची काळजी, महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, रक्तक्षय प्रतिबंध आणि आरोग्यविषयक योजनांबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य सुविधा थेट गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने प्रभावीपणे काम करावे, असे निर्देश आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांनी दिले.

या बैठकीला महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, . आशा व आरोग्य सेविका उपस्थित होत्या.



बैठकीदरम्यान आरोग्य केंद्रांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती पोहोचविणे आणि विविध आजारांबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.

डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, महापालिकेची आरोग्य केंद्रे ही नागरिकांसाठी आरोग्य मंदिरे आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र, मुकुंदनगर आरोग्य केंद्राच्या परिसरात नुकसान केले जाते, कचरा टाकला जातो तसेच वाहनांचे पार्किंग केले जाते. त्यामुळे आरोग्य सेवा पुरविताना अडचणी निर्माण होतात. या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी सूचना त्यांनी केली.

शहरातील महिलांपर्यंत पोहोचून त्यांच्या हिमोग्लोबिनची तपासणी करणे आवश्यक आहे. महिलांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळल्यास रक्त वाढविण्यासाठी आवश्यक औषधे, उपचार आणि घ्यावयाच्या काळजीबाबत माहिती द्यावी. हिमोग्लोबिन कमी झाल्यामुळे कोणत्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात, याबाबतही महिलांमध्ये जनजागृती करावी. ही माहिती घराघरांत पोहोचविण्याची महत्त्वाची जबाबदारी आशा सेविकांनी पार पाडावी.

वाईट विचारांच्या प्रवृत्तींचा विनाश होतो; चुकीच्या मार्गाने जाऊ नका : आ. जगताप

तुळजाभवानी माता मंदिरात हिंदू धर्मसभा व रावण दहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दसरा सणानिमित्त पाईपलाइन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिर देवस्थानच्या वतीने हिंदू धर्मसभा आणि रावण दहन सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी विचार भारतीचे संस्थापक राजाभाऊ मुळे यांना त्यांच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते 'शिवशंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी दसरा सणाचा आनंद घेतला. धार्मिक परंपरा, संस्कृती आणि सामाजिक विचारांची देवाणघेवाण घडवून आणणाऱ्या या सोहळ्यात हिंदू धर्मसभेच्या माध्यमातून सामाजिक व धार्मिक कार्याचा गौरव करण्यात आला.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, दसरा सणाला रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यामागे त्याच्या चुकीच्या विचारांचा आणि कृत्यांचा विनाश हा संदेश आहे. रावणाला त्या काळात बलाढ्य शक्ती म्हणून ओळखले जात होते; मात्र त्याचे विचार आणि कृती चुकीची होती. सीतेचे अपहरण करून त्याने चुकीचे पाऊल उचलले आणि प्रभू श्रीरामचंद्रांनी त्याच्या वाईट प्रवृत्तीचा अंत केला. त्यामुळे



प्रत्येकाने चुकीच्या विचारांपासून दूर राहून चांगल्या मार्गाने वाटचाल केली पाहिजे. वाईट विचारांच्या प्रवृत्तींचा अखेर विनाश होत असतो, असे त्यांनी सांगितले.

श्री तुळजाभवानी माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी भाविक एकत्र येऊन धार्मिक उत्सव उत्साहात साजरे करतात आणि एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करतात. अशा कार्यक्रमांमुळे संत-महंतांच्या विचारांची तसेच सण-उत्सवांच्या परंपरेची जपणूक होते. देवस्थानच्या वतीने विचार भारतीचे संस्थापक राजाभाऊ मुळे यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची समाजाला ओळख करून देण्यात आली आहे. त्यांनी चांगली माणसे घडविण्याचे आणि हिंदू धर्माचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. हे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे, असे आमदार जगताप म्हणाले.

देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे यांनी सर्वांना सोबत घेऊन धार्मिकतेचे कार्य सुरू केले . त्यांच्या या कार्याला आपले नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाहीही आमदार संग्राम जगताप यांनी दिली. पुरस्कारप्राप्त राजाभाऊ मुळे म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०१ वर्षे पूर्ण झाली आहेत. आपण वयाच्या पाचव्या वर्षापासून संघाच्या शाखेत जात आहोत. 'शिवशंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार' हा श्री तुळजाभवानी मातेचा प्रसाद म्हणून स्वीकारला असून, तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला समर्पित करीत आहोत. हिंदू धर्माचे कार्य समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जात आहे.

जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय, तालुका- पारनेर, जि. अहिल्यानगर

फोन नं. (०२४८८) २२१५२८ ईमेल आयडी tahasildarparner@gmail.com

क्र.कावि/अभिलेख/१४९/२०२५ पारनेर दिनांक. ३०/०९/२०२६

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर यांचे न्यायालय

अर्जदार- स्वप्निल लक्ष्मण ढवळे रा. निघोज ता. पारनेर जि. अहिल्यानगर

विरुध्द

ग्रामपंचायत कार्यालय निघोज, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

विषय- जन्म-मृत्यु नोंद सुधारणा अधिनियम, २०२३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदार- स्वप्निल लक्ष्मण ढवळे रा. निघोज ता. पारनेर जि.अहिल्यानगर यांनी त्यांच्या चुलत्यांच्या मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकांनी त्यांच्या मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. त्यांच्या मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ. न.	नाव	अर्जदाराशी नाते	मृत्यू दिनांक
१.	एकनाथ सखाराम ढवळे	चुलता	१८/०५/१९८५

निबंधकांनी दिलेल्या जन्म/मृत्यु नोंदीच्या अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. तसेच या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या चुलत्यांच्या मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

सही/-
शिक्का
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पारनेर

दखल

लघुलेखन अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

पुणे : मराठी लघुलेखन अभ्यासक्रमाला महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाकडून ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुकांनी http://msbsvet.edu.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपप्राचार्य अ.अ. साबळे यांनी केले आहे. ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रत तसेच प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती औंध प्रशिक्षण संस्थेत ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. त्याच दिवशी गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही दुपारी ३ वाजता औंध प्रशिक्षण संस्थेत सुरु होणार आहे, असेही श्री. साबळे यांनी कळविले आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध मनाई आदेश जारी

पुणे : पुणे विभाग शिक्षक व पदवीधर निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान व २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. पार्श्वभूमीवर मतदान व मतमोजणी प्रक्रिया सुरळीत शांततेत पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस प्रशासनाकडून विविध मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण २० मतदान केंद्र व ३५ बुथवर मतदान होणार आहे. या आदेशान्वये प्रचार संपल्यानंतर मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षांशी संबंधित कोणतीही व्यक्ती ते ज्या विधानपरिषद मतदारसंघाचे मतदार नाहीत त्या म तदारसंघात थांबण्यास, वास्तव्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०१३ चे कलम १६३ अन्वये पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रांतर्गत शस्त्र परवानाधारकांना शस्त्र ताब्यात ठेवण्यास व बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे तथापि छान आणि समितीने ज्यांना सवलत दिलेली आहे त्या शस्त्र परवानाधारकांना हा म्हणे आदेश लागू होणार नाही. छाननी समितीने सवलत दिलेली असली तरीही निवडणुकीच्या कोणत्याही कार्यक्रमादरम्यान जवळ बाळगू नयेत. मतदान व मतमोजणी प्रक्रिया होणाऱ्या ठिकाणापासून शंभर मीटर सभोवतालच्या परिसराच्या आतील सर्व व्यावसायिक दुकाने रेस्टॉरंट टपऱ्या स्थापना, अत्यावश्यक सेवा वगळून सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवाव्यात. मतदान केंद्र व परिसरात आतील भागात कोणत्याही प्रकारचे हत्यार अग्निशस्त्रे जवळ बाळगता येणार नाहीत हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय अंमलदाराला लागू राहणार नाही.

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघांसाठी उद्या मतदान

पुणे : महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार असून, पुणे जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी १६०, तर शिक्षक मतदारसंघासाठी ७२ अशी एकूण २३२ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या दोन्ही मतदारसंघांत पदवीधर मतदारसंघासाठी ४७, तर शिक्षक म तदारसंघासाठी ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक तयारी केली आहे.

निवडणुकीच्या मतदानासाठी चार तासाची सवलत

पुणे : पुणे शिक्षक व पदवीधर मतदार संघाची निवडणूक शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार आहे. त्या अनुषंगाने खाजगी आस्थापना, खाजगी कंपन्या,मॉल्स, दुकाने व आस्थापना इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या या निवडणुकीसाठी पात्र असलेल्या मतदारांना चार तासांची विशेष सवलत देणे आस्थापनावर बंधनकारक आहे. ही सवलत पगारी असेल. त्याबाबत कोणतेही वेतन कपात करण्यात येऊ नये. याबाबत कोणतीही तक्रार असल्यास कामगारांनी कामगार उप आयुक्त पुणे यांच्या कार्यालयातील वूलश्रर्पिश २०२१सारळश्र. लेाया मेलवर तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन सहायक कामगार आयुक्त सु.तु. शिर्के यांनी केले आहे.

स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो प्रकल्पाच्या वाहतुकीत बदल

पुणे : स्वारगेट ते कात्रज दरम्यान भूमिगत मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू असून मार्केट यार्ड परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीमध्ये तात्पुरते स्वरूपात बदल करण्यात आले आहेत.

अपर बिबवेवाडी कडून चंद्रलोक चौक मार्गे पुष्पमंगल चौकात येणाऱ्या वाहनांना स्वारगेट, मार्केटयार्ड, उत्सव हॉटेलकडे उजवीकडे वळण्यास बंदी करण्यात आली आहे. या मार्गावरील वाहनांनी डावीकडे वळून तनिष्क शोरूम समोरून अरणेश्वर बस स्टॉप येथून यू टर्न घेऊन स्वारगेट कडे जावे.स्वारगेट कडून पुणे सातारा रोडने तसेच मार्केट यार्ड कडून सातारा, कात्रज, बिबेवाडी कडे जाणारी वाहतूक ही वेलनेस मेडिकल स्टोअर तसेच भापकर पेट्रोल पंपाच्या बाजूने पुष्पमंगल चौकातून कात्रज अपर बिबवेवाडी मार्गे वळविण्यात आली आहे. पुष्पमंगल चौकाकडून मार्केटयार्ड, उत्सव हॉटेल चौक येथून उजवीकडे वळण्यास बंदी करण्यात आली

जिल्ह्यात ८५ टक्के पिकांचे पंचनामे पूर्ण

आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील २५ टक्के पंचनामे पूर्ण, पंचनाम्याचे काम गतीने सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट व अन्य नैसर्गिक घटकांमुळे बाधित झालेल्या पुणे जिल्ह्यातील ट्रिगर १ अंतर्गत आठ तालुके व ट्रिगर २ अंतर्गत २ तालुके अशा एकूण १० तालुक्यांम ध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. शासनाच्या निर्देशानुसार या तालुक्यांमध्ये पंचनामे सुरु असून ट्रिगर १ अंतर्गत ८ तालुक्यातील ८५ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत.

जिल्ह्यातील भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या आठ तालुक्यांमध्ये ट्रिगर १ व आंबेगाव, जुन्नर मध्ये ट्रिगर २ अंतर्गत समावेश करण्यात आला आहे. ८ तालुक्यातील ३,०८,९५४ हेक्टर क्षेत्रापैकी २ लाख ६१ हजार ३१४ हेक्टर क्षेत्रावरील ४ लाख ८६ हजार १८९ खातेदारांचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. तालुकानिहाय आकडेवारीनुसार भोर १२ हजार ९२६, वेल्हा ४ हजार ८२२, खेड ३९ हजार १२९ शिरूर ३० हजार ११०, बारामती ५२ हजार १३०, इंदापूर ४८ हजार ९८९, दौंड ३९ हजार ९९७ आणि पुरंदर ३३ हजार २११ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. आंबेगाव व जुन्नरम ध्ये पंचनाम्याचे काम गतीने सुरू : दुसऱ्या टप्प्यात जाहीर करण्यात आलेल्या आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील २५ टक्के पंचनामे पूर्ण झाले असून आंबेगाव तालुक्यातील ५ हजार २१७ खातेदारांचे १ हजार १०७ हेक्टर क्षेत्रावरील तर जुन्नर तालुक्यातील १२ हजार ९७ खातेदारांचे ८ हजार १३५ हेक्टर क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित काम गतीने सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

कोंढापुरी येथील खुनाचा चोवीस तासांत छडा

- एका युवकासह दोघे अल्पवयीन शिक्रापूर पोलिसांच्या ताब्यात
- गरबा पाहताना निर्जनस्थळी नेऊन तिघांकडून युवकाचा खून

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

तळेगाव ढमढेरे, : कोंढापुरी (ता. शिरूर) येथील खंडोबा मंदिर परिसरात असलेल्या तळ्याजवळ महेंद्र लव सकट या युवकाचा धारदार शस्त्राने वार करुन खून केल्याची घटना घडली असताना सदर खुनाचा त्याच दिवशी छडा लावण्यात शिक्रापूर पोलिसांना यश आले असून पोलिसांनी प्रथम श नानासाहेब राऊत याच्यासह दोन अल्पवयीन युवकाला ताब्यात घेतले आहे.

कोंढापुरी (ता. शिरूर) येथील खंडोबा मंदिर परिसरात असलेल्या तळ्याजवळ महेंद्र लव सकट (वय २४ वर्षे रा. करडे रोड रांजणगाव गणपती ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. पाचेगाव बुद्रुक ता. सांगोला जि. सोलापूर) या युवकाचा धारदार शस्त्राने वार करुन खून केल्याची घटना समोर आली असता लव विष्णू सकट (वय ५८ वर्षे रा. करडे रोड रांजणगाव गणपती ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. पाचेगाव बुद्रुक ता. सांगोला जि. सोलापूर) यांनी शिक्रापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरु केला असता सदर मयताच्या साथीदारांनी त्याचा खून करुन अहिल्यानगर मध्ये पलायन केल्याचे समोर आले, त्यानंतर पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंतराव गिरी, पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर, जिनेश कोळी, अंकुश कारंडे, पोलीस हवलदार अमोल दांडगे, रोहिदास पारखे, शिवाजी चीतारे, विश्वांबर वाघमारे, अम ोल चव्हाण, राम जाधव, नागेश वाघमारे, नारायण वाळके, मच्छिंद्र निचित यांसह आदींनी तीन पथके बनवून अहिल्यानगर गाठत आरोपींना बेलापूर बायपास येथून ताब्यात घेतले त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता आरोपी व मयत एकमेकांचे मित्र असून कोणी कोणासोबत फिरायचे आणि कोणी कोणासोबत बोलायचे या वरुन त्यांच्यात वाद असल्याने या वादातून प्रथमेश राऊत सह दोघा अल्पवयीन युवकांनी महेंद्र सकट याला गांजा पिण्याचे आमिष दाखवून निर्जनस्थळी घेऊन जाऊन त्याच्या चाकूने तब्बल वीस वेळा भोकसून त्याचा खून केल्याचे सांगितले, दरम्यान पोलिसांनी प्रथमेश नानासाहेब राऊत (वय २२ वर्षे रा. खळवाडी ढोकसांगवी ता. शिरुर जि. पुणे) याला अटक करत दोन अल्पवयीन युवकांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंतराव गिरी, पोलीस हवालदार नितीन सुद्रिक व राहुल गडदे हे करत आहे.



कोंढापुरी (ता. शिरूर) येथे खून करणाऱ्या आरोपीला अटक करणारे पोलीस पथक.

गरबा खेळायला गेला आणि जिवाला मुकला

कोंढापुरी येथे खून झालेला युवक रांजणगाव गणपती येथे नवरात्रोत्सवच्या कार्यक्रम मध्ये गरबा पाहत असताना दुचाकीहून आलेल्या प्रथमेश राऊत व त्याच्या सहकाऱ्यांनी महेंद्र सकट याला गांजा पिण्याचे आमिष दाखवून कोंढापुरी येथे घेऊन जात त्याच्यावर चाकूने वीस वेळा भोकसून खून केल्याचे समोर आले आहे.

दिवेआगर दुर्घटनेप्रकरणी विनर्स अकॅडमीच्या संस्थापक शिक्षकासह पाच जणांवर गुन्हा

आळंदी : दिवेआगर समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेत आळंदी येथील विनर्स अकॅडमीच्या आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी अकॅडमीच्या संस्थापक शिक्षकासह पाच जणांविरुद्ध दिघी सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहलीचे योग्य नियोजन न करणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेशा उपाययोजना न करणे आणि त्यांना समुद्रात पोहण्यासाठी पाठविणे, असे आरोप तक्रारीत करण्यात आले आहेत. मृत विद्यार्थी राजवीर वहीले याचे वडील युवराज वहीले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ ऑक्टोबर रोजी गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

विनर्स अकॅडमीचे संस्थापक शिक्षक अमर आदक, मृणाल नारखेडे आणि अन्य कर्मचाऱ्यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी रायगड किल्ला आणि श्रीवर्धन परिसरातील समुद्रकिनाऱ्यावर सहलीचे नियोजन केले होते. रायगड किल्ल्यावरील रोपवे बंद असतानाही त्यासाठी शुल्क घेण्यात आले आणि विद्यार्थ्यांना पायऱ्यांच्या मार्गाने गडावर नेण्यात आले, असा आरोप तक्रारीत आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना नियोजित श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याऐवजी दिवेआगर येथील निर्जन समुद्रकिनाऱ्यावर नेण्यात आल्याचेही तक्रारदाराने नमूद केले आहे. विद्यार्थ्यांना पोहता येत नसल्याची माहिती असतानाही त्यांना समुद्रात उतरविण्यात आले. तसेच, त्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती साधने आणि पुरेशी व्यवस्था करण्यात आली.

दुष्काळाचे सावट; आंबेगावचा बळीराजा संकटात

भात, सोयाबीनचे नुकसान; पंचनामे होऊनही भरपाईची प्रतीक्षा

नवनाथ फलके । राष्ट्र सह्याद्री

डिंभे : आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात पावसाच्या खंडामुळे भात आणि सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आहुपे, पाटण आणि भीमाशंकर खोऱ्यांतील सुमारे पाच हजार १०० हेक्टर भातशेतीला फटका बसला आहे. पिके करपू लागल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

प्रारंभी दुष्काळसदृश गावांच्या यादीत आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यांचा समावेश नव्हता. दिलीप वळसे पाटील यांच्या पाठपुराव्यानंतर या तालुक्यांचा समावेश करण्यात आला. नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे झाले; मात्र भरपाई अद्याप मिळाली नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

सरसकट कर्जमाफीच्या घोषणेनंतरही प्रत्यक्ष कर्जमाफीबाबत स्पष्टता नाही. पीएम किसान आणि नमो शेतकरी योजनेच्या लाभाबाबतही शेतकऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. त्यातच शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, कर्जमाफीची अंम लबजावणी करावी आणि शेतीमालाला योग्य भाव मिळवून द्यावा, अशी मागणी होत आहे.

शासनाने घोषित केलेल्या सरसकट कर्जमाफी मध्ये शेतकऱ्यांना तूर्ता दिलासा मिळाला होता मात्र अद्याप पर्यंत एकही शेतकऱ्याला कर्जमाफी झाली नाही यामुळे बळीराजाच्या तोंडाला जणू पाणे पुसल्या सारखं दिसून येत आहे. आंबेगाव तालुक्यातील पहिले यादीत आलेले प्रत्येक सोसायटीमध्ये पाच ते दहा लोक सोडले तर एकही व्यक्तीला कर्जमाफी झाली नाही मग कर्जमाफी नक्की मिळणार तरी कधी?

– राजेंद्र फलके, शेतकरी

पाऊस न झाल्याने आणि उन्हाची तीव्रता वाढल्याने कुपनलिका तसेच विहिरी यांची पाण्याची पातळी घटली आहे, बारमाही चालणाऱ्या विहिरीही आता तळ गाठत आहे यातूनच जमिनीतील पाण्याची क्षमता समजून येत आहे आत्ताच अशी परिस्थिती असली तर उन्हाळ्यात कशी .कांदा पीक करावे की नाही ,पाणी नाही तर शेती कशी करावी असा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला आहे

–रामशेठ फलके कांदा उत्पादक शेतकरी

पावसाने दडी मारल्याने भात रोपे पूर्णता करपून गेली. उदरनिर्वाहासाठी मागील वर्षाचे असणारे भाताचे बियाणे रोजी रोटी साठी काही प्रमाणात विकले मात्र आता यावर्षी जर भात पीक आलेच नाही तर घरचा उदरनिर्वाह करायचा कसा, ऐन दिवाळीमध्ये कर्जाचा डोंगर डोक्यावर घेऊन कशी दिवाळी साजरी करावी. घोटभर पाण्यासाठी आत्ताच आम्हाला वणवण करावे लागत असेल तर उन्हाळ्यामध्ये काय परिस्थितीला सामोरे जावे लागेल

–मारुती घोडे, बोरघर



आळंदीत विजयादशमीचा उत्साह; खंडोबा मंदिरात सीमोल्लंघन सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी : संतभूमी आळंदीत विजयादशमी अर्थात दसरा सण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दसऱ्यानिमित्त शहरातील धार्मिक परंपरेनुसार सायंकाळी सहा वाजता खंडोबा मंदिर येथे सीमोल्लंघन सोहळा पार पडला. यावेळी संत ज्ञानेश्वर माऊली, नरसिंह सरस्वती स्वामी, श्रीराम आणि काळभैरवनाथ यांच्या पालख्यांचे अखंड हरिनामाच्या गजरात आगमन झाले. टाळ-मृदंगाचा निनाद, भाविकांचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर खंडोबा मंदिर येथे आळंदी देवस्थानच्या वतीने विधिवत शमीपूजन करण्यात आले. दसऱ्याच्या दिवशी शमीपूजन आणि सीमोल्लंघनाला धार्मिक परंपरेत विशेष महत्त्व आहे. या परंपरेनुसार देवतांच्या पालख्यांचे आगमन झाल्यानंतर पूजनविधी पार पडला. उपस्थित मान्यवर आणि भाविकांनी या सोहळ्यात सहभागी होत धार्मिक परंपरेचे दर्शन घेतले.

या सोहळ्याला आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त पुरुषोत्तम पाटील, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर, राहुल चिताळकर, नगरसेवक सोम नाथ कुऱ्हाडे, सागर कुऱ्हाडे, गोविंद कुऱ्हाडे, माजी नगरसेवक प्रकाश कुऱ्हाडे, माजी सभापती शीधर कुऱ्हाडे, नंदकुमार कुऱ्हाडे, संजय घुंडरे, योगिराज कु-हाडे, अमित कुऱ्हाडे, महेश कुऱ्हाडे, सतीष कुऱ्हाडे, समीर कुऱ्हाडे, शामराव गिलबिले, नंदकुमार वडगावकर, अजित वडगावकर, आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमाजी नरके, मच्छिंद्र शेंडे, भिमाजी घुंडरे आणि सौरभ रानवडे आदी उपस्थित होते.

दिवे-सोनोरीच्या पालख्यांचे सीमोल्लंघन उत्साहात

शेकडो वर्षांची परंपरा जपली; शिवेवर पालख्यांच्या भेटीसाठी नागरिकांची गर्दी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

दिवे : दिवे गावचे ग्रामदैवत श्री कातोबानाथ आणि सोनोरीचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ यांच्या पालख्यांचा सीमोल्लंघन सोहळा शेकडो वर्षांची परंपरा जपत मोठ्या उत्साहात पार पडला. ढोल-ताशांचा गजर, सनई-चौघड्यांचे सूर, गुलालाची उधळण आणि 'सोनं लुटण्या'च्या उत्साहात दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी दसरा साजरा केला. शिवेवर दोन्ही पालख्यांची झालेली भेट हा सोहळ्यातील अविस्मरणीय क्षण ठरला.

दुपारी दोन वाजता दिवे आणि सोनोरी येथील पालख्यांचा प्रस्थान सोहळा शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत सुरू झाला. ढोल-ताशांच्या गजरात आणि सनई-चौघड्यांच्या मंगलमय सुरांत पालखी सोहळा मार्गस्थ झाला. चावडीसमोर रंगतदार छबिना सादर करण्यात आला. यावेळी गुलालाची मुक्तपणे उधळण झाल्याने ग्रामस्थ अक्षरशः गुलालाने माखून गेले होते.



दिवे आणि सोनोरीच्या ग्रामदैवतांच्या पालख्यांची शिवेवर भेट होताना.

पालखी मार्गावर ठिकठिकाणी महिलांनी आकर्षक रांगोळ्या काढून पालखीचे स्वागत केले. तसेच खांदेकऱ्यांचे मनोभावे पूजन करण्यात आले. चावडीजवळ पालखी येताच संतोष झेंडे आणि ग्रामस्थांच्या वतीने पालखी सोहळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर चावडीसमोर झालेल्या रंगतदार छबिन्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

पुढे टिळेकर मळा येथे चंद्रकांत टिळेकर, नितीन टिळेकर आणि राजेंद्र टिळेकर यांच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करून पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पालखी सोहळा गावच्या शिवेवर पोहोचला. तेथे गावचे पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे आणि दिगंबर दिवेकर यांनी पालखीचे पूजन केले. दसऱ्यानिमित्त सोने लुटण्यासाठी ग्रामस्थांची एकच झुंबड उडाली.

शिवेवर दोन्ही पालख्यांची ऐतिहासिक भेट

दिवे आणि सोनोरीच्या शिवेवर दोन्ही ग्रामदैवतांच्या पालख्यांची भेट झाली. हा सोहळा पाहण्यासाठी दिवे, सोनोरी परिसरातील शेकडो नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी ग्रामस्थांनी दोन्ही पालख्यांवर आपट्याच्या पानांची, अर्थात सोन्याची, मुक्तपणे उधळण केली. दोन्ही पालख्या शिवेवर विसावल्यानंतर ग्रामस्थांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. यावेळी पारंपरिक तलवारबाजीचा खेळही सादर करण्यात आला.रात्री छबिन्याच्या गजरात आणि वाद्यांच्या निनादात दोन्ही पालख्या आपापल्या मंदिरांत विसावल्या. दिवे-सोनोरीच्या दसरा उत्सवाला शेकडो वर्षांची परंपरा असून, हा सोहळा पाहण्यासाठी बाहेरगावचे नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या सोहळ्यास रमेश झेंडे, पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे, सरपंच रूपेश राऊत, झेंडेवाडीचे सरपंच अमर झेंडे, माजी सरपंच गुलाब झेंडे, रमेश झेंडे, सागर तात्या काळे, रमेश झेंडे, भरत झेंडे,रामभाऊ झेंडे,सोनोरीच्या सरपंच श्रद्धा काळे, बाळासाहेब काळे, गणपत शितकल,सुनील शिंदे,राजेंद्र टिळेकर यांच्यासह दोन्ही गावांतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्रापूर पोलिसांकडून वाहने मूळ मालकांच्या स्वाधीन

पोलिसांच्या उपक्रमात दोन महिन्यात चक्क ६७ वाहने परत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

तळेगाव ढमढेरे, : शिक्रापूर (ता. शिरूर) पोलीस स्टेशन आवारामध्ये गुन्हे, अपघात व बेवारस स्थितीत पोलिसांच्या ताब्यात असलेल्या वाहनांचा शोध घेऊन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या पुढाकारातून ६७ वाहने मूळ मालकांच्या स्वाधीन करण्याची उल्लेखनीय कामगिरी शिक्रापूर पोलिसांनी केल्याने पोलिसांनी अवघ्या दोन महिन्यांत ६७ वाहने मूळ मालकांच्या ताब्यात दिल्याने मालक वाहनमालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) पोलीस स्टेशन आवारात विविध गुन्हे, अपघात व बेवारस स्थितीत मिळालेली अनेक वाहने दीर्घकाळ पडून असल्याने वाहनांच्या मूळ मालकांचा शोध घेऊन वाहने परत देण्याचे आव्हान पोलिसांसमोर असताना पोलीस हवलदार नवनाथ नाईकडे, महिला पोलीस अंमलदार अक्षदा पानमंद यांनी वाहनांचे क्रमांक, चेसि व इंजिन क्रमांकाच्या आधारे वाहनमालकांचा शोध घेऊन संपर्क करत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया करुन नुकतेच पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या उपस्थितीत ६७ वाहने मूळ मालकांच्या ताब्यात दिली आहे, तर शिक्रापूर पोलिसांनी १० सप्टेंबर रोजी १३ लाख ६० हजार रुपये किमतीच्या ३२ दुचाकी त्यांनतर नुकतेच १८ व १९ ऑक्टोबर रोजी आणखी २३ लाख ६० हजार रुपये किम तीची ३५ दुचाकी व चारचाकी वाहने परत दिली असल्याने दोन महिन्यांत एकूण ६७ वाहने आणि ३७ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांना परत मिळाला आहे. पोलीस स्टेशन आवारात असलेली वाहने गुन्ह्यांचा तपास करण्यापुरते मर्यादित न राहता नागरिकांच्या मालमत्तेची परतफ ेड करण्यासाठी देखील शिक्रापूर पोलिसांनी पुढाकार घेतल्याचे या कामगिरीतून दिसून आले आहे.

शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या परिसरात आवारात अद्याप देखील काही बेवारस वाहने असून संबंधित वाहनमालकांनी वाहनाच्या मालकी हक्काचे पुरावे व आवश्यक कागदपत्रांसह पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा अन्यथा नियमानुसार संबंधित वाहनांच्या लिलावाची प्रक्रिया करण्यात येईल असे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी सांगितले.



शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या आवारातील वाहने मूळ मालकांच्या स्वाधीन देताना पोलीस अधिकारी व कर्मचारी.

कर्जत-जामखेडच्या चौघांची उमेदवारी जाहीर

जिल्हा बँकेच्या बिनविरोध निवडीस ब्रेक!



मागच्या निवडणुकीत ज्याच्यासाठी जीवाचे रान केले. यंदा त्याच नावास प्रखर विरोध

मागच्या पंचवार्षिक निवडणुकीत राम शिंदे यांनी अंबादास पिसाळ यांच्या विजयासाठी जीवाचे रान केले होते. विशेष म्हणजे मीनाक्षी बाळासाहेब साळुंके यांच्यासाठी आमदार रोहित पवार यांनी ४५ मतदार सदस्य सहलीवर नेले होते. मात्र त्यावेळी पिसाळ यांच्या बरोबर राम शिंदे आणि माजी खासदार सुजय विखे यांनी त्या सदस्यातून तब्बल ९ मतदार फोडत अवघ्या एका मताने विजय खेचून आणला होता. मात्र या निवडणुकीत राम शिंदेंनी अंबादास पिसाळ यांना प्रखर विरोध करीत मतदारसंघात विखे पिता-पुत्रांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : अहिल्यानगर जिल्हा बँकेची निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी घडत अखेर बिनविरोध निवडीची प्रक्रिया निवडणूकीपर्यंत येवून ठेपली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी एकी दाखवली मात्र ऐनवेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी वाटाघाटी चालू असतानाच अर्ज माघारी घेण्याच्या काही वेळा पूर्वीच कर्जत-जामखेडच्या चार ही उमेदवारांच्या नावाची घोषणा करीत जिल्हा बँकेच्या बिनविरोध निवडीस ब्रेक लावला. अखेर राम शिंदेंनी वार्षिक अहवालात फोटो न छापल्याचा बदला सहकाराच्या प्रस्थापितांच्या विरोधात घेतलाच अशी चर्चा रंगू लागली.

मागील आठ ते दहा दिवसापासून जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. सहकार क्षेत्रातील दिग्गज विखे-थोरात यांनी एकत्र येत काही जागा बिनविरोध करण्यात यश मिळवले. मात्र अगोदर पासूनच या निवडणुकीत राम शिंदेंनी विखे-थोरात यांच्यावर नाराजी असलेल्या स्थानिक नेत्यांची भेट घेत निवडणूक रंगतदार बनवली. रविवारी सर्वच स्थानिक नेत्यांनी पत्रकार परिषद घेत नवीन फॉर्म्युला अमलात आणल्याची चर्चा सुरू झाली. सोमवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी चमत्कार घडेल असे वाटत असताना जेष्ठनेते यशवंतराव गडाख यांच्या निवासस्थानी चर्चेच्या फैरी झडत असताना अचानक राम शिंदेंनी कर्जत-जामखेडच्या चार ही उमेदवारांच्या नावाची घोषणा करीत बिनविरोध निवडणुकीस ब्रेक लावला. कर्जतच्या सेवा सोसायटी मतदारसंघात ज्योती शिंदे यांच्या नावाची घोषणा केली. तर महिला राखीव गटातून मंजुषा गुंड यांचे नाव जाहीर केले. जामखेडमधून सोसायटीसाठी सचिन घुमरे तर ओबीसी गटातून अजिनाथ हजारे यांच्या नावाची घोषणा केली. राम शिंदेंच्या या पोस्टने स्थानिक मतदारसंघात धुमाकूळ घातलाच. पण भविष्यात त्यांचा पंगा आता रोहित पवारांसह विखे-थोरात या जोडी बरोबर होणार आहे.

वार्षिक अहवालात फोटो न छापल्याची सल जिव्हारी... राम शिंदे निवडणुकीत उतरले

वास्तविक पाहता राम शिंदे यांची कर्जत-जामखेड मतदारसंघात ही चौथी टर्म आहे. २०१४-१९ या काळात ते जिल्ह्याचे पालकमंत्री राहिले. मात्र त्यांनी या १५ वर्षात कधीच जिल्हा बँकेच्या राजकारणात लक्ष घातले नव्हते ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मात्र मागील जिल्हा बँकेच्या वार्षिक अहवालात त्यांचा फोटो न छापल्याने त्यांचा राग अनावर झाला होता. तोच धागा पकडत त्यांनी यापुढे आपण जिल्हा बँकेत नक्कीच लक्ष देवू असा इशारा दिला होता. तो शब्द त्यांनी अखेर आज पाळला.

सोमवारी कर्जतमधून अड कैलास शेवाळे, काकासाहेब तापकीर यांच्यासह बाळासाहेब साळुंके, राजेंद्र देशमुख या जाणकार मंडळींनी माघार घेतल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर विखे गटाकडून कट्टर समर्थक असलेले अंबादास पिसाळ (तुषार पिसाळ) यांना उमेदवारी मिळाल्याने आगामी काळात मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

द•ख•ल



पारनेरमध्ये ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात

पारनेर : पारनेर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे बौद्ध बांधवांच्या वतीने ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित बांधवांनी बौद्ध संस्कृती, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचे स्मरण केले. या कार्यक्रमात युनिटी ऑफ मूलनिवासी समाज राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित बौद्ध बांधवांच्या सहभागातून सामुदायिक बौद्ध वंदना आणि सूत्रपठण करण्यात आले. या वेळी संपूर्ण परिसरात शांततामय व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेने भारतीय समाजात समता, मानवता आणि सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू झाला. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ धार्मिक उत्सव नसून अन्याय, विषमता आणि भेदभावाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा दिवस म्हणूनही महत्त्वाचा मानला जातो. या कार्यक्रमास बाळासाहेब पातारे, शंकर नगरे,वीरेंद्र पवार, आयुष्यमती शुभांगी पवार, किरण सोनवणे, सचिन नगरे,मधुकर पवार, संपत पवार, रामकृष्ण पवार, साहेबराव गायकवाड, बी. टी. साळवे, बाळासाहेब शेटे, तुषार सोनवणे,भगवान नगरे, सखाराम पातारे, चंद्रकांत गायकवाड यांच्यासह अनेक बौद्ध बांधव उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन महामानवांना अभिवादन करत धम्माच्या विचारांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.पारनेर शहरातील या कार्यक्रमातून सामाजिक एकता, बंधुता आणि समतेचा संदेश देण्यात आला.

समर्थ शैक्षणिक संकुलात शारदीय नवरात्रोत्सव विविध उपक्रमांनी साजरा



निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे येथे 'उत्सव विचारांचा, जागर स्त्रीशक्तीचा' या संकल्पनेअंतर्गत शारदीय नवरात्रोत्सव विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये स्त्रीशक्तीचा सन्मान, आरोग्यविषयक जागरूकता, सामाजिक भान, सायबर सुरक्षेचे महत्त्व आणि भारतीय संस्कृतीतील परंपरांविषयी आदरभाव निर्माण करण्यावर भर देण्यात आला. नवरात्रोत्सवानिमित्त संकुलात विविध विषयांवरील प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये अंजली पारगावकर यांनी 'योगा आणि मनःशांती' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. नीलम गायकवाड यांनी 'शारीरिक आणि मानसिक आरोग्य' या विषयातून निरोगी जीवनशैलीचे महत्त्व स्पष्ट केले. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने समर्थ शैक्षणिक संकुलात खंडेनवमीचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, डॉ. लक्ष्मण घोलप प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत समर्थ आयटीआय विभाग तसेच समर्थ पॉलिटेक्निकच्या कार्यशाळेत यंत्रपूजन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने पूजन करून ज्ञान, कौशल्य, श्रम आणि कार्यसाधनेसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या उपक्रमातून भारतीय संस्कृतीतील परंपरा आणि आधुनिक तांत्रिक शिक्षण यांचा सुंदर समन्वय साधण्यात आला.

मुलींचा कबड्डी संघ जिल्ह्यात सलग दुसऱ्या वर्षी उपविजेता



निघोज : विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना प्रोत्साहन देत त्यांच्यात सांघिक भावना, शिस्त आणि जिद्द निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शाळेच्या १७ वर्षांखालील मुलींच्या कबड्डी संघाने जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळवत शाळेला घवघवीत यश मिळवून दिले आहे. अनुष्का सुपेकर हिने संघाचे कर्णधारपद सांभाळले. मुलींनी आत्मविश्वास, जिद्द आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर हा विजय मिळविला.कबड्डी खेळात १७ वर्षाखालील मुलींचा संघ साईशा बेलोटे , इशिका वराळ, अनुष्का सुपेकर, मृणाल बेलोटे, सिद्धी मुळे, वेदिका पठारे, अवनी मेसे, रिद्धी मुळे, ईश्वरी बेलोटे, समृद्धी गावडे, अदिती बोरकर, श्रावणी पानगे या यशस्वी कामगिरीमागे क्रीडा शिक्षक दत्ता मांडगे आणि अक्षय मदने यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या सर्व यशस्वी खेळाडूंचे शाळेचे अध्यक्ष श्री. शांताराम कळसकर, सेक्रेटरी श्री .वसंत कवाद , प्राचार्य श्री. डायस सर , व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद तसेच न्यू इंग्लिश मीडियम स्कूल चे सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व पालक यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात मिळवलेले हे यश शाळेसाठी अभिमानास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

बौद्ध संस्कार संघातर्फे २५ ऑक्टोबरला वर्षावास समारोप सोहळा

अहिल्यानगर : बौद्ध संस्कार संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने बौद्धधर्मीय वर्षावास समारोप सोहळ्याचे आयोजन रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत चेतना लॉन्स, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. या सोहळ्यात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे, अशी माहिती बौद्ध संस्कार संघाचे भाऊसाहेब देठे यांनी दिली. वर्षावासाच्या चार महिन्यांच्या कालावधीत 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पवित्र ग्रंथाचे वाचन व प्रबोधन करण्यात आले. या धार्मिक उपक्रमाच्या समारोप सोहळ्यास भंते धम्मपाल यांची उपस्थिती लाभणार आहे. भगवान गौतम बुद्धांचे विचार, धम्माचे महत्त्व आणि त्यातून मिळणारी मानवतावादी शिकवण यांचा प्रसार या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

राशीनच्या श्री जगदंबा यमाई देवीचा पालखी महोत्सव दिमाखात साजरा!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राशीन येथील श्री जगदंबा (यमाई) देवीचा पारंपरिक पालखी महोत्सव मंगळवारी (दि. २० ऑक्टोबर) विजयादशमीच्या पर्वावर मोठ्या भक्तिभावात आणि दिमाखात साजरा झाला. 'उदो बोला उदो, आईसाहेबांचा उदो', 'बोल भवानी की जय' अशा गगनभेदी जयघोषाने संपूर्ण राशीन नगरी दुमदुमून गेली. ढोल-ताशे, नगारे, झांजांचा लयबद्ध गजर, रणशिंगाचा निनाद, तोफांच्या सलामी आणि गुलाल-खोबऱ्याच्या उधळणीने पालखी सोहळ्याला अविस्मरणीय स्वरूप प्राप्त झाले. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या लाखो भाविकांच्या उपस्थितीने भक्तिसागराला उधाण आले होते.

विजयादशमीच्या पारंपरिक प्रथेनुसार देवीला कौल मागण्याचा धार्मिक विधी पार पडला. मंगळवारी रात्री सुमारे ११ वाजून ५२ मिनिटांनी देवीने फूल दिल्यानंतर भाविकांनी एकच जल्लोष केला. 'उदो बोला उदो, बोल भवानी की जय'च्या जयघोषात देवीच्या मुखवट्यांवर आणि पालखीवर गुलाल, खोबरे तसेच पैशांच्या नाण्यांची मुक्तहस्ते उधळण करण्यात आली. रंगीबेरंगी तोफांच्या सलामीने आणि फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर उजळून निघाला. नगाऱ्यांचा गजर, आराधींचे भक्तिगीत आणि दिवट्यांच्या प्रकाशाने सोहळ्याची धार्मिक परंपरा अधिकच खुलून दिसली.

यमाई देवीची पालखी दर्शनासाठी पारंपरिक प्रदक्षिणा मार्गावरून नेण्यात आली. पालखीच्या स्वागतासाठी महिलांनी मार्गावर आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. ठिकठिकाणी देवीची साडी-चोळी, खण-नारळाने ओटी भरून भाविकांनी दर्शन घेतले. पालखीवर गुलालाची उधळण करत भाविकांनी देवीप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. पालखीचे दर्शन घेण्यासाठी मार्गावर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. चंगाळे-बंगाळ्यांचे मर्दानी खेळ, आराधींचे जथ्थे आणि दिवट्यांच्या उजेडाने उत्सवाला पारंपरिक वैभव प्राप्त झाले.

देवीचा कौल पाहण्यासाठी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. भाविकांना हा धार्मिक विधी पाहता यावा, यासाठी विश्वस्त मंडळाच्या वतीने फूल देण्याचा कार्यक्रम पडद्यावर दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

पुस्तकांच्या पानापानात दरवळला हळदी कुंकवाचा सुगंध



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर पाडळी आळे (ता. पारनेर) येथील 'पिंटो ग्रंथालय' 'वाचन संस्कृतीचा जागर' या या कार्यक्रमाची सांगता हळदीकुंकू समारंभाने झाली.

या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, सरपंच कविता डेरे यांनी वाचन चळवळ घराघरात पोहोचवण्यासाठी वाचनाचे महत्त्व महिला भगिनींना समजून सांगितले. महिलांच्या आवडत्या पुस्तकांवरती उत्कृष्ट अभिपाय विजेते सौ.अपर्णा जगताप, पूजा शिंदे, सुरेखा आवारी, ज्योती लायगुडे, पूजा गावडे, तसेच वैशाली डोकडे व अंजना डोकडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक सन्मानचिन्ह कै. दत्तात्रेय गावडे यांच्या स्मरणार्थ दिले गेले. साधना डेरे व उज्वला डेरे यांच्या यांच्यातर्फे दिलेली क्रांतीज्योती सावित्रीबाई मानाची पैठणी ज्योती लायगुडे यांना मिळाली.

गेल्या ८ दिवसांपासून सुरू असलेल्या या स्पर्धेला महिलांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असून, ज्ञानाचा एक नवा जागर गावात पाहायला मिळाला आहे. या उपक्रमामुळे एरवी शेतात आणि घरकामात व्यस्त असणाऱ्या महिलांच्या हात ग्रंथालयात आता पुस्तके शोधू लागली. 'शेतात राबणारे हात आता ग्रंथांच्या पानांवरून फिरले असून नवरात्रीच्या काळात १४० महिला वाचक सभासद झाल्या आहेत. नवरात्रीत आदिशक्तीच्या पूजेसोबतच सुरू असलेला हा 'ज्ञानशक्तीचा जागर'

आज महाराष्ट्रातील दुष्काळाचे सावट पाहता हा दुष्काळ शेतकऱ्याच्या बांधावर दिसत असला तरी याची झळ आपल्या चुलीपर्यंत पोहोचलेली असून यासाठी पाणीबचत आणि शेतीसाठी पाण्याचा वापर काटकसरीने करावा लागणार आहे याबाबतचे आवाहन योगशिक्षिका सुरेखाताई आवारी केले. उपस्थित महिलांनी दुष्काळाशी लढण्याचा संकल्प आजच्या कार्यक्रमात केला. पिंटो ग्रंथालयाच्या कर्तव्यदक्ष सेविका काजल येवले यांच्या कन्येच्या भविष्यातील शिक्षणासाठी ख्यातनाम लेखक श्री. जेरी पिंटो सर यांच्याकडून 'इएमजी' माध्यमातून १ लाख रुपयांची दानरुपी मदतीचा चेक सौ. रजनीताई थोरात, सरपंच सौ. कविताताई डेरे यांच्या शुभहस्ते हस्ते काजल येवले यांना सुपूर्द करण्यात आला. हळदीकुंकूच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष रजनीताई थोरात ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून मोनिका थोरात, विमल थोरात, संगीता शिर्के मॅडम, ज्योती डेरे, अलका परंडवाल, सोसा. व्हाईस चेअरमन मनीषा डेरे, माजी सरपंच अरुणा डेरे, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पाताई डेरे, ग्रा. स. अश्विनी डेरे, संगमेश्वर महिला ग्राम संघ शेकडो महिला उपस्थितीत पार पडला.

श्री रेणुका माता देवस्थानात सिमोल्लंघन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र अमरापुर येथील श्री रेणुका माता देवस्थानात उत्साहात सुरु असलेल्या नवरात्रमहोत्सवाची आज मंगळवारी सायंकाळी विजयादशमीला श्री भगवान परशुरामाच्या पालखी मिरवणुकीने सिमोलंघन करून शस्त्र व शमीपूजन केल्यानंतर सांगाता झाली. यानिमित्त आज सकाळी सात वाजता आईसाहेबांना दुधाचा अभिषेक घालण्यात आला . यावेळी आईसाहेबांची विविध फळांची आरस करण्यात आली होती . सकाळी साडेदहाला आखेगाव येथील श्री जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रवर्तक राम महाराज झिंजुर्के यांचे हरी कीर्तन झाले . यावेळी भाविक श्रोत्यांची मोठी गर्दी झाली. साडे अकराला महानैवैद्य व महाआरती करण्यात आली सायंकाळी साडेपाचला भगवान परशुरामाची पालखी मिरवणूक काढण्यात येऊन सिमोलंघन करण्यात आले. यावेळी प्रज्ञेश,रुद्रांश व देवांश भालेराव यांचे समवेत डॉ प्रशांत भालेराव यांचे हस्ते शस्त्रपूजन व शमी पूजन करून भगवान परशुरामाची पालखी देवस्थानातील शमी गणपती, महादेव, गुरुदत, महालक्ष्मी , तुळजाभवानी, विठ्ठल रुक्मिणी, अनुसया माता व अत्री भगवान, परशुराम, जमदग्नी ऋषी, हनुमान,कालभैरव आदि मंदिरासह चंद्रकांत दादा महाराजाच्या समाधी मंदिरातून मिरवणुकीने आईसाहेबांच्या मंदिराच्या प्रवेश दारात आल्यानंतर तेथे कुसुमांड बळी देऊन मंदिरात पालखी नेण्यात आली. साडेसहाला महाआरती आणि त्यानंतर साडेआठला शेजारती करण्यात आली.

शिवभक्तांच्या साक्षीने रावण दहन, दुर्गामाता महादौडीचा दिमाखदार समारोप!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



जामखेड : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष, आई दुर्गामातेचा गजर, शिवकालीन मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके आणि हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत रावण दहन अशा उत्साहपूर्ण वातावरणात जामखेडमध्ये विजयादशमीचा सण साजरा करण्यात आला. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दुर्गामाता महादौडीचा समारोप सोमवारी, २० ऑक्टोबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात झाला. यानिमित्त शहरात भक्ती, शौर्य आणि शिवप्रेमाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. जामखेड शहरात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने गेल्या २५ वर्षांपासून दुर्गामाता दौडीची परंपरा जपली जात आहे. नवरात्रातील घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत दररोज शेकडो शिवप्रेमींच्या सहभागातून ही दौड पार पडली. यंदाही शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विजयादशमीच्या दिवशी आयोजित महादौडीने या परंपरेची दिमाखदार सांगता झाली. दुर्गामाता मंदिरापासून महादौडीला प्रारंभ विजयादशमीच्या दिवशी बाजारतळ येथील दुर्गामाता मंदिरापासून महादौडीला प्रारंभ झाला. शहरातील विविध ठिकाणी महादौडीचे पूजन करण्यात आले.

महापुरुषांच्या जयघोषाने आणि शिवरायांच्या प्रेरणादायी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. ठिकठिकाणी नागरिकांनी महादौडीचे स्वागत केले. लोहारदेवी मंदिरात महाआरती अन् शिवकालीन मर्दानी खेळांचा थरार! खर्डा रोडवरील जामखेडचे ग्रामदैवत श्री लोहारदेवी मंदिर येथे महादौड पोहोचल्यानंतर महाआरती करण्यात आली.

त्यानंतर शस्त्रपूजन करून शिवकालीन मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

चिमुकल्या मावळ्यांचा शौर्यविष्कार!

लाठी-काठी, दांडपट्टा अन् तलवारबाजीने जिंकली जामखेडकरांची मने! श्री लोहारदेवी मंदिर परिसरात लहान मुला-मुलींनी सादर केलेल्या शिवकालीन मर्दानी खेळांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. लाठी-काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजीतील कौशल्यपूर्ण हालचालींनी शिवकालीन युद्धकलेचा जिवंत अनुभव दिला. चिमुकल्या मावळ्यांचा आत्मविश्वास, शिस्त आणि धाडसी सादरीकरण पाहून उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. शिवरायांचा पराक्रम केवळ इतिहासात नाही, तर नव्या पिढीच्या मनामनांत रुजत असल्याचे चित्र या मर्दानी खेळांतून पाहायला मिळाले.

हुंडा, चारित्र्याच्या संशयातून विवाहितेचा छळ

आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी श्रीगोंद्याच्या सासरच्या मंडळींवर गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : हुंड्याची मागणी, चारित्र्यावर संशय आणि वारंवार होणारी मारहाण व मानसिक छळाला कंटाळून श्रीगोंदा तालुक्यातील सांगवी दुमाला येथील विवाहितेने आत्महत्या केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांविरुद्ध पुण्यातील समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साक्षी अविनाश नलगे असे मृत विवाहितेचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

लग्नानंतर छळ सुरू झाल्याचा आरोप

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, साक्षी हिचा विवाह २ डिसेंबर २०२५ रोजी अविनाश संपतराव नलगे (रा. सांगवी दुमाला, ता. श्रीगोंदा) याच्याशी झाला होता. लग्नानंतर काही महिने संसार सुरळीत सुरू होता. मात्र, त्यानंतर पती अविनाश नलगे, सासू शकुंतला संपतराव नलगे, नणंद प्रियांका अजिंक्य नलगे आणि नणंदेचे पती अजिंक्य नलगे यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

हुंडा आणि चारित्र्यावरून टोमणे

लग्नात माहेरच्या मंडळींनी हुंडा दिला नाही, अशी बोलणी करणे, चारित्र्यावर संशय घेऊन अपमानास्पद टोमणे मारणे, मारहाण करणे तसेच रात्री-अपरात्री घराबाहेर काढणे, असे प्रकार घडत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या सततच्या त्रासामुळे साक्षी मानसिक तणावाखाली होती, असा आरोपही करण्यात आला आहे.

आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप; पोलिसांचा तपास सुरू

मे २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत साक्षीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी तिचे वडील संतोष संपतराव कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास समर्थ पोलीस करीत असून, गुन्ह्यातील आरोपांची सत्यता तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

विवाहितेच्या मृत्यूप्रकरणी तपास सुरू

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.२२ ऑक्टोबर २०२६ । पान ८

विखे पाटील यांच्या आढावा बैठकांमुळे प्रशासन 'ॲक्शन मोड'वर

दुष्काळसदृश परिस्थितीत पाणी, चारा आणि पीक नुकसानीच्या प्रश्नांवर उपाययोजनांना गती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाने दिलेली ओढ, खरीप पिकांचे नुकसान आणि पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न लक्षात घेऊन पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी तालुकानिहाय आढावा बैठका घेतल्या आहेत. या बैठकांमुळे दुष्काळसदृश परिस्थितीतील प्रश्न प्रशासनाच्या प्राधान्यक्रमावर आले असून, पाणीटंचाई निवारण, चारा उपलब्धता, पीक नुकसानीचे पंचनामे आणि अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे मार्गी लावण्यासाठी प्रशासन 'क्शन मोड'वर आले आहे.

सप्टेंबर महिन्यात पावसाने ओढ दिल्यानंतर जिल्ह्यातील टंचाईचा प्रश्न गंभीर झाला. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी विविध तालुक्यांतील परिस्थितीचा आढावा घेत उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन, शेतकऱ्यांना दिलासा आणि पशुधनाचे संरक्षण यावर भर दिला. पारनेर तालुक्यातील बैठकीत पिण्याच्या पाण्याचे नियोजन, पारनेर शहर व परिसराला सुपा औद्योगिक वसाहतीतून पाणी उपलब्ध करून देण्याची शक्यता आणि ८० ते ९० टक्के पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना



देण्यात आल्या. राहुरी, कर्जत-जामखेड आणि अकोले परिसरातील पाणी व चारा टंचाईच्या प्रश्नांवरही उपाययोजनांचे नियोजन सुरू आहे.

दुष्काळाच्या काळात पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. धरणांतील उपलब्ध साठा, प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, ग्रामीण नळपाणी योजना आणि टँकरद्वारे होणारा पुरवठा यांचे समन्वयाने नियोजन करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. टंचाईग्रस्त गावांची स्थिती, जलस्रोतांची उपलब्धता आणि टँकरची गरज यांची अचूक माहिती संकलित करून उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. गावांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी उद्भवाच्या ठिकाणी गाळण प्रकल्प उभारण्याच्या प्रयोगासाठी निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीही देण्यात आली आहे. दरम्यान, चारा टंचाईचा प्रश्न लक्षात घेऊन चारा डेपो सुरू करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्याची भूमिका विखे पाटील यांनी व्यक्त केली. कमी जागेत व कमी पाण्यात पौष्टिक चारा तयार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पशुधनाची संख्या, चाऱ्याची गरज आणि चारा उत्पादनासाठी इच्छुक शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागाला देण्यात आले.

जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र शासनाचे पथक ९ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगरमध्ये येऊन गेले. आता आढावा बैठकांतून निश्चित झालेल्या उपाययोजनांची प्रभावी आणि वेळेत अंमलबजावणी झाल्यास टंचाईग्रस्त गावांसह शेतकरी आणि पशुपालकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

माळवाडगाव शिवारात शॉर्टसर्किटमुळे शेतकऱ्यांचा २५ एकर ऊस जळून खाक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगांव : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव शिवारात आज बुधवार दि.२१ रोजी दुपारी १२ .४५ च्या सुमारास वीजेच्या तारेवरील शॉर्टसर्किट मुळे आग लागून गळीतासाठी जाणारा आठ ते दहा शेतकऱ्यांचा २५ एकर ऊस आगीत जळून गेल्याने शेतकऱ्यांचे दुष्काळ परिस्थितीच्या तोंडावर प्रचंड नुकसान झाले आहे.

माळवाडगांव गावालगतच कमालपूर रस्त्यावर प्रारंभी भागचंद आण्णासाहेब आसने यांच्या गट नंबर २५१ मधील ऊसास वीजेच्या तारेच्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागली वरतून कडक ऊन अन् पूर्वेकडून पश्चिमेकडे जोराचे वारे वाहत असल्याने ही आग पश्चिमेकडील शेताकडे वाऱ्याबरोबर झेपावली. नितीन गोरख आसने, सुनील गोरख आसने, आदिनाथ कडुबा आसने, यांच्या ऊस शेतातून गट नंबर २५३ मधील सर्वाधिक ऊस क्षेत्राचा समावेश असलेल्या बाळासाहेब दत्तात्रय आदिक, विजय दत्तात्रय आदिक, निर्मला विजय आदिक ,द्वारकाबाई बाळासाहेब आदिक, शाम बाळासाहेब आदिक, प्रदीप विजय आदिक या सर्वांचे ऊस क्षेत्र आगीतून वाचू शकले नाही. चार दिवसांपूर्वी भंडारदरा आवर्तनाचे पाणी परिसरातील सर्व ऊसांना देण्यात आलेले असल्याने, प्राथमिक आग आटोक्यात आणण्यासाठीचे ट्रॅक्टरने रोटाव्हेटर उपाय निष्फळ ठरले.



आदिक बंधूचे ऊस क्षेत्राचा सर्वाधिक समावेश आहे.

अशोक कारखाना अग्निशामक बंद नादुरुस्त असल्याने, नगरसेविका मंजुश्री मुरकुटे व सिध्दार्थ मुरकुटे यांनी तातडीने श्रीरामपूर नगरपालिका अग्निशामक दल पाठविण्यास सहकार्य केले अग्निशामक नामक बंब येईपर्यंत वाऱ्यामुळे आदिक यांच्या शेतातील ऊस संपूर्ण जळालेला होता.मात्र पूर्वेकडील भागवत आण्णासाहेब आसने,व अन्य शेतकऱ्यांचे ऊसाची आग अग्निशामक दलाने आटोक्यात आणली.

अशोक कारखान्यांशी संपर्क साधला असता अग्निशामक बंब नादुरुस्त असल्याचे सांगण्यात आल्याने, महिला बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा,नगरसेविका मंजुश्री मुरकुटे व सिध्दार्थ मुरकुटे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी तातडीने नगरपालिका अग्निशामक दल माळवाडगांवी पाठविले. तोपर्यंत आदिक बंधूंचे सर्व ऊस क्षेत्र आगीचे भक्षस्थानी पडलेले होते.मात्र गट नंबर २५१ मधील ऊस क्षेत्रातील आगीचे तांडव उत्तर बाजूने सुरूच होते.भामाठान रस्त्याने अग्निशामक बंब शेतात उतरविण्यात येऊन स्थानिक मदतीला आलेल्या शेतकऱ्यांचे सहकार्याने अग्निशामक दलाने दुपारी दिड ते दोनच्या दरम्यान आग आटोक्यात आणली. महावितरण भोकर सबस्टेशनचे कनिष्ठ अभियंता व वीज कर्मचारी वीजपुरवठा बंद करून घटनास्थळी दाखल झाले होते. महसूल विभागाचे मंडल अधिकारी व तलाठी पंचनामा करण्यासाठी येणार असल्याचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी सांगितले.

शेती आवर्तनाच्या अखेरच्या दिवशी पाण्यावरून वाद

जेसीबीद्वारे पाणी अडविण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : भंडारदरा धरणातून सुरू असलेल्या शेती आवर्तनाच्या अखेरच्या दिवशी नॉर्दन ब्रँच कालव्याच्या मुठेवाडगाव-माळवाडगाव परिसरात पाण्यावरून वाद निर्माण झाला. कालव्यातील उर्वरित पाणी स्वतःच्या शेताकडे वळविण्यासाठी तसेच बंधाऱ्यात अडविण्यासाठी काही स्थानिक कार्यकर्त्यांनी जेसीबीचा वापर केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या प्रकारामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेती आवर्तनादरम्यान पाणी सुरळीत मिळावे, यासाठी शेतकरी प्रयत्नशील असताना आवर्तनाच्या शेवटच्या दिवशी पाण्याचे नियोजन कोलमडल्याचा आरोप होत आहे. यापूर्वी काही शेतकऱ्यांना पाणी दिल्यानंतर उर्वरित पाणी सर्वसामान्य शेतकऱ्यांना मिळावे, अशी अपेक्षा होती. मात्र, काही प्रभावशाली स्थानिक कार्यकर्त्यांनी उर्वरित पाणी स्वतःच्या शेताकडे वळविण्याचा प्रयत्न केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

या प्रकारात राजकीय पक्षांशी संबंधित काही कार्यकर्ते आणि एका माजी सरपंचाचा सहभाग असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

जेसीबीच्या साहाय्याने पाणी अडविण्याचा प्रयत्न झाल्याने कालवा निरीक्षकांसह संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. घटनेनंतर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नसल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, पाण्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी या संपूर्ण प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. कालव्यातील पाण्याचा वापर, पाणीवाटपाचे नियोजन आणि पाण्याची झालेली नासाडी याबाबत पुराव्यांसह माहिती समोर आणणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

कालव्याच्या आवर्तनातील पाणीवाटप पारदर्शक पद्धतीने व्हावे आणि कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये, यासाठी संबंधित विभागाने या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

सार्वजनिक शांतता भंग केल्याच्या आरोपातून भाजपा नेते पाशा पटेल निर्दोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष व भाजप नेते पाशा पटेल यांची जामखेड येथील जाहीर सभेतील अश्लील वक्तव्य व हावभाव इशारे करून सार्वजनिक शांतता भंग केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी जी. जी. सोनी यांनी या खटल्याचा निकाल दिला आहे या खटल्याची सविस्तर माहिती अशी की, २०२४ मधील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान कर्जत जामखेडचे भारतीय जनता पार्टीचे तत्कालीन उमेदवार प्रा राम शिंदे यांच्या प्रचारार्थ दिनांक १४/ ११/ २०२४ रोजी भारतीय जनता पार्टीचे नेते पाशा पाटील यांनी जाहीर सभा घेतलेली होती. सदरच्या फिर्यादीवरून जामखेड येथील पोलिसांनी तपास करून पाशा पटेल यांचे विरोधात येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. जी. जी. सोनी यांच्या न्यायालयामध्ये दोषारोपपत्र भारतीय न्याय संहितेचे कलम २९६ व ३५२ प्रमाणे दाखल केले होते.या खटल्याची जलद गतीने सुनावणी पार पडली. या खटल्यामध्ये सरकार पक्षाच्यावतीने एकूण सहा साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. या सहा साक्षीदारांची उलट तपासणी पाशा पटेल यांच्यावतीने ॲड. गोरक्ष पालवे यांनी घेतली. उलट तपासणी दरम्यान सदरील साक्षीदारातील मुख्य फिर्यादी व तपासी अंमलदार यांचे कडून सदरील सभेसंदर्भातल्या अत्यंत महत्त्वाच्या बाबी न्यायालयाच्या निदर्शनास ॲड. गोरक्ष पालवे यांनी आणून दिल्या. सदरच्या बाबी न्यायालयाने ग्राह्य धरून न्यायालयाने पाशा पटेल यांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश पारित केलेले आहेत.

भारतीय जनता पार्टीचे नेते पाशा पटेल यांचे वतीने ॲड. गोरक्ष पालवे, ॲड. कैलासराव शेवाळे, ॲड. मिर्झा मणियार यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. गुरविंदर पंजाबी, ॲड. सागर गरजे, ॲड. रोहित बुधवंत, ॲड. राहुल दहिफळे, ॲड. विशाल वांढेकर धनश्री खेतमाळीस रोहित चांडवले विवेक बडे पुष्कराज बिडवाई प्रवीण निंबाळकर विवेकानंद बडे तेजस राख भक्ती तमनर बाळकृष्ण गीते यश केकान आश्विनी मोरे भालेराव अनिकेत आंधळे उत्कर्ष उगलमुगले श्रावणी सानप व वैष्णवी आव्हाड यांनी सहाय्य केले.

पोलीस दूरक्षेत्रा समोरून मालवाहतूक गाडीतून रक्कम चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



टाकळीभान : टाकळीभान पोलीस दूरक्षेत्रा समोरून बेकरी व्यवसायकाचे ९५ हजार रुपये मालवाहतूक गाडीतून चोराने चोरून नेले. श्रीरामपूर येथील हिंदुस्तान बेकरीचा माल मालवाहतूक मॅजिक नंबर एम एच १२ ट थ-०० ३७ या गाडीतून चालक अब्बास पठाण हे बेकरीचा माल घेऊन औरंगाबाद येथे गेले होते, माल देऊन परत येत असताना, सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान टाकळीभाने येथे टाकळीभान पोलीस दूरक्षेत्रासमोर गाडी थांबून, चहा पिण्यासाठी गेले असता, तीन महिला व एक पुरुष या चोरांनी गाडी ठेवलेले मालाचे पैसे ९५ हजार घेऊन पसार झाले. ड्रायव्हरच्या चहा पिऊन गाडीत आल्यावर त्याच्या लक्षात आल्याने पैसे चोरीला गेले, तोपर्यंत तीन महिला एक पुरुष पसार झाले, टाकळीभानचे पोलीस मित्र बाबा सय्यद व गाडीचे ड्रायव्हर हे चोर गेले त्या मार्गाने गेल्या असतात दिसून आले नाही. त्यानंतर श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनची पी आय अरुण धनवटे व पोलीस कर्मचारी येऊन चोराचा तपास सीसीटीव्हीचे आधारे घेत आहे. परी डी,वाय,एस,पी, कल्पना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करत आहे.

श्रीरामपुरात ५१ फुटी रावणाचे उत्साहात दहन

'आपलं ठेवायचं झाकून, दुसऱ्याचं बघायचं वाकून?' या घोषवाक्याने वेधले लक्ष; महिलांच्या हस्ते रावण दहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : विजयादशमीनिमित्त परिवर्तन समितीच्या वतीने आयोजित श्रीरामपूर ग्रामस्थांचा मानाचा ५१ फुटी रावण दहन सोहळा राजे छत्रपती संभाजी महाराज चौक येथे उत्साहात पार पडला. कामगार नेते नागेश सावंत, शिवसेनेचे नेते सचिन बडदे आणि भाजपचे युवा नेते तिलक डुंगरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यंदा रावणाच्या प्रतिमेवर लिहिलेल्या 'आपलं ठेवायचं झाकून, दुसऱ्याचं बघायचं वाकून?' या घोषवाक्याने नागरिकांचे विशेष लक्ष वेधले.

रावण दहनातून वाईट प्रवृत्ती, अहंकार आणि अन्यायाचा अंत करून सत्याच्या विजयाचा संदेश देण्यात आला. मात्र, यंदाच्या घोषवाक्यामुळे शहरातील राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये विविध चर्चांना सुरुवात झाली. श्रीरामपूर जिल्ह्याची अनेक वर्षांपासूनची मागणी, भविष्यातील पाणीटंचाईचे संकट आणि शहराच्या विकासाशी संबंधित प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर या संदेशाची विशेष चर्चा झाली.

महिलांच्या हस्ते रावण दहन

यंदाच्या सोहळ्यात महिलांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले. सविता सावंत, चारुशीला डुंगरवाल, भाग्यश्री बडदे, महिला पोलीस अधिकारी शीतल मुंगटे, नगरसेविका मंजुश्री मुरकुटे, ॲड. चंचल सावंत, माजी नगरसेविका अर्चना पानसरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील महिलांनी या उपक्रमात सहभाग घेतला. नारीशक्तीच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या सोहळ्यास आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाने, माजी नगराध्यक्षा अनुराधा अधिक, भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, माजी उपनगराध्यक्ष संजय फंड, विविध नगरसेवक, राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार उपस्थित होते.

प्रशासनाच्या सहकार्याने सोहळा यशस्वी

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिवर्तन समितीच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. नगरपालिका प्रशासन, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाचे सहकार्य लाभले. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे सोहळा शांततेत पार पडला. शहरातील नागरिक आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रावण दहनाचा आनंद घेतला.

रावणावरील घोषवाक्यामुळे सार्वजनिक जीवनातील विसंगतींवर आत्मपरीक्षण करण्याचा संदेश मिळाल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली होती.



शिर्डीत रिक्षा चालकांचा ठिय्या!

साई संस्थानच्या स्कूल बसने प्रवासी वाहतूक बंद करण्याची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : साई संस्थानच्या स्कूल बसमधून साई नगर रेल्वे स्टेशन वरून भक्तांची नियमबाह्य पद्धतीने वाहतूक केली जात असल्याचा खळबळजनक आरोप करत संतप्त रिक्षा चालकांनी शिर्डी रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर तब्बल दोन तास ठिय्या केला. यामुळे रेल्वे स्टेशन परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

रिक्षा चालकांनी दिलेल्या माहितीनुसार रेल्वे स्टेशनवर दाखल होणाऱ्या साई भक्तांना मंदिरापर्यंत किंवा शहरात घेऊन जाण्यासाठी साई संस्थानच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या स्कूल बसेसचा वापर केला जात आहे. या बसेसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांना कोंबून वाहतूक केली जात असल्याचा गंभीर आरोपही रिक्षा चालकांनी केला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या बसेसचा असा बेकायदेशीर वापर होतो कसा, असा थेट सवाल रिक्षा चालक संघटनेने उपस्थित केला आहे. साई संस्थानच्या या प्रकारामुळे स्थानिक रिक्षा चालकांच्या रोजीरोटीवर गदा आली असून अनेक चालकांवर उपासमारीची वेळ आल्याची भावना व्यक्त होत आहे. साई भक्तांची वाहतूक हाच आमचा उदरनिर्वाहाचा मुख्य स्रोत असताना संस्थानच आमच्या पोटावर लाथ मारत असल्याचा संताप रिक्षा चालकांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना एका रिक्षा चालक प्रतिनिधीने सांगितले की, संस्थानच्या स्कूल बसेसचा वापर विद्यार्थ्यांऐवजी साई भक्तांसाठी केला जातोय, प्रवाशांना कोंबून नेले जात आहे, यामुळे आमचे मोठे नुकसान होत आहे आणि ही बेकायदेशीर वाहतूक तातडीने बंद झाली पाहिजे.

दरम्यान सुमारे दोन तास चाललेल्या या ठिय्या नंतर रिक्षा चालकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. जर साई संस्थानने स्कूल बसेसद्वारे सुरू असलेली ही नियमबाह्य प्रवासी वाहतूक तातडीने बंद केली नाही, तर येत्या काळात तीव्र आणि आक्रमक पद्धतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.